शुक्रवार, ०२ डिसेंबर २०२२
⊙ किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -११०
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●FRIDAY 02 DECEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-110 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-5

# काँग्रेसला रामाचे अस्तित्व मान्य नाही

## १०० तोंडांचे रावण म्हणणाऱ्या मल्लिकार्जुन खरगेंना पंतप्रधान मोदींचे चोख प्रत्युत्तर

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदाबाद : 'तुम्ही १०० तोंडांचे रावण आहात का?' असा खोचक प्रश्न काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी अहमदाबादमधील बेहरामपुरा येथे प्रचारसभेत विचारला होता. मोदी सगळीकडे दिसतात, महापालिकेच्या निवडणुकीत, विधानसभेच्या निवडणुकीत, लोकसभा निवडणुकीत, सगळ्याच निवडणुकीत मोदींचा चेहरा पुढे केला जातो. महालिकेच्या निवडणुकीत उमेदवारांच्या नावे मत मागा, पालिकेत गरज लागली तर मोदी काम करायला येणार आहेत का?, असा सवाल खरगे यांनी केला होता. खरगेंच्या या टीकेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी प्रत्युत्तर दिले आहे. मी खरगेंचा सन्मान करतो. पण, हे रामभक्तांचे गुजरात आहे, हे काँग्रेसला माहित नाही. रामभक्तांच्या या भूमीवर खरगेंना '१०० तोंडाचे रावण' म्हणण्यास सांगण्यात आले. कारण, काँग्रेसला रामाचे अस्तित्व मान्य नाही. अयोध्येतील राममंदिरावर त्यांचा विश्वास नाही हे आम्हाला माहित आहे. त्यांना राम सेतूचीही समस्या आहे. आता माझ्याबद्दल वाईट बोलण्यासाठी काँग्रेसने रामायणातून रावण आणला आहे, असा हल्लाबोल मोदींनी खरगेंवर केला आहे.**



पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, म्हणाले, काँग्रेसमध्ये स्पर्धा लागली की काँग्रेसचे पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'रावण' असा उल्लेख केला होता. त्यामुळे गुजरात विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात काँग्रेस आणि भाजपा यांच्यात राजकीय चिखलफेक सुरु होती. खरगे यांच्या मोदींवरील उपहासात्मक टिप्पणीमुळे भाजपाच्या हाती आयते कोलीत मिळाले होते. तसेच, 'गुजराती अस्मिते'ला विरोध करणाऱ्या काँग्रेसला मतदान न करण्याचे आवाहन भाजपा नेते करत आहेत.

काँग्रेसने माझ्यावर टीका केल्याचे आश्चर्य वाटत नाही. पण, माझ्यावर खालच्या पातळीवर टीका करूनही काँग्रेसला आणि त्यांच्या नेत्यांना कधीही पश्चाताप आणि दुःख झाले नाही. पंतप्रधानांबद्दल वाईट बोलणे, हा आपला हक्क आहे, असे काँग्रेसला वाटते. कारण, काँग्रेसचा लोकशाहीवर विश्वास असता तर ते कधीच या थराला गेले नसते. परंतु, त्यांचा लोकशाहीवर नाहीतर एका कुटुंबावर विश्वास आहे. एका कुटुंबाला खूश करण्यासाठी कोणत्याही स्तराला जाऊ शकतात, अशी टीका पंतप्रधान मोदींनी केली आहे. मोदींना कोण जास्त वाईट शब्द बोलेल, यासाठी काँग्रेसमध्ये स्पर्धा सुरु आहे. मात्र, आता त्यांना धडा शिकवायचा आहे. त्यामुळे येत्या ५ तारखेला कमळाला मतदान करावे, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. पंतप्रधान मोदी दुसऱ्या टप्प्यात होणाऱ्या निवडणुकीसाठी कलोलमध्ये प्रचार करताना बोलत होते.

## महत्वाची बातमी

### बीड बायपासवरील दुभाजक ठरताहेत जीवघेणे



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** बीडबायपासचे बांधकाम सुरू असून चारपदरी रस्ता तयार करण्यात येत आहे. या रस्त्यावर दुभाजक बांधण्यात येत असून त्याचे डिजाईन धोकादायक असल्याचे सिद्ध होत आहे. एकाबाजूने दुसरीकडे जाण्यासाठी रस्ता ओलांडताना 4 फूट उंचीच्या काँक्रीट दुभाजकामुळे पलीकडून येणारी कमी उंचीची वाहने दिसत नाहीत, त्यामुळे अचानक पुढे गेले तर पलीकडून वेगाने येणाऱ्या वाहनाशी धडक होते आणि मधेच थांबले तर मागून येणारे वाहन आपल्याला उडवते, असे अपघात सुरू झालेत. त्यामुळे क्रॉसिंगच्या ठिकाणी 100 मीटरपर्यंत डिव्हायडरची उंची 2फूट ठेवली तर दोन्ही बाजूकडील वाहने एकमेकांना पाहू शकतील व वेगाचा अंदाज घेऊन रस्ता ओलांडता येईल परंतु हे सदोष दुभाजक तांत्रिकदृष्ट्या चुकीचे असताना त्याला मान्यता कोणी दिले हे तपासणे आवश्यक आहे. रस्त्याचे कामही खूपच धिम्या गतीने सुरू असून वाहनचालकांना व रहिवाशांना धुळीचा प्रचंड त्रास होत आहे. टेंडरमध्ये कंत्राटदाराने नियमित धुळीवर पाणी मारण्याची व्यवस्था करण्याची अट असूनही कंत्राटदार पाणी मारीत नाही, त्यामुळे नागरिकांना श्वसनाचा व डोळ्यांचे आजार वाढत आहेत.

## संघ मुख्यालय परिसरात बॉम्बस्फोटाची धमकी

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मुख्यालय परिसरात बॉम्बस्फोट करणार असून पोलीस आयुक्तांमध्ये हिम्मत असेल तर त्यांनी हा बॉम्बस्फोट हाणून पाडावा,' अशी धमकी देणारे निनावी पत्र सक्करदरा पोलिसांना मिळाले. त्यामुळे खळबळ उडाली आहे. धमकीपत्र गांभीर्याने घेत सक्करदरा पोलिसांनी सचिन कुलकर्णी नावाच्या व्यक्तीला ताब्यात घेतले आहे. कुलकर्णी हा महापारेषणमध्ये अतिरिक्त कार्यकारी अभियंता आहे. २५ नोव्हेंबरला सक्करदरा पोलीस ठाण्याला एक निनावी पत्र मिळाले होते. 'संघ मुख्यालय परिसरात बॉम्बस्फोट करणार, पोलीस आयुक्तांमध्ये हिम्मत असेल तर त्यांनी हा हल्ला हाणून पाडावा,' असे त्यात नमुद आहे. पत्र मिळताच पोलीस दलात खळबळ उडाली. सक्करदराचे ठाणेदार पाटील यांनी विशेष पथक स्थापन केले. पत्र आल्याच्या दिवसापासून ते पथक धमकी देणाऱ्या व्यक्तीचा शोध घेत होते.

## साध्वी प्रज्ञासिंहसह दोन आरोपींकडून दोषमुक्तीची याचिका मागे

### मालेगाव बॉम्बस्फोट खटला

आधुनिक केसरी न्यूज

**मालेगाव :** येथे २००८ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटांशी संबंधित खटल्यात २०० हून अधिक साक्षीदारांचे साक्षीपुरावे नोंदवण्यात आले आहेत. खटल्याच्या या टप्प्यावर प्रकरणातून दोषमुक्त करण्याच्या याचिकेवर सुनावणी घेतली जावी का? या उच्च न्यायालयाने केलेल्या विचारणेनंतर खटल्यातील आरोपी खासदार साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर आणि समीर कुलकर्णी यांनी दोषमुक्तीच्या मागणीसाठी केलेली याचिका गुरुवारी मागे घेतली. दुसरीकडे प्रकरणातील आणखी एक प्रमुख आरोपी ले. कर्नल प्रसाद पुरोहित याच्या दोषमुक्तीच्या याचिकेवरील निर्णय न्यायालयाने राखून ठेवला. या प्रकरणी आतापर्यंत २८८ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली आहे. खटला सुरू होण्यापूर्वी पुरोहित, कुलकर्णी आणि भोपाळच्या खासदार साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर यांनी प्रकरणातून दोषमुक्त करण्यासाठी विशेष न्यायालयात अर्ज केला होता. मात्र राष्ट्रीय तपास यंत्रणा कायद्यांतर्गत (एनआयए) स्थापन विशेष न्यायालयाने त्यांचा अर्ज फेटाळून लावून खटल्याला सुरुवात केली होती. त्यानंतर आरोपींनी या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. आवश्यक त्या मंजुरीविना आपल्यावर कारवाई केल्याचा दावा आरोपींनी प्रकरणातून दोषमुक्त करण्याची मागणी करताना केला आहे.



पुरोहित याने खटला चालवण्यास सरकारने दिलेल्या मंजुरीलाही आव्हान दिले आहे. मंजुरीबाबतची याचिका पुरोहित याने मागे घेतली. या याचिकांवर न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती प्रकाश नाईक यांच्या खंडपीठाने मागील सुनावणीच्या वेळी खटल्याच्या मंजुरीचा मुद्दा खटला सुरू झाल्याने मागे पडला असल्याचे म्हटले होते. त्यामुळे खटल्याच्या या टप्प्यावर आरोपींच्या दोषमुक्त करण्याच्या मागणीचा विचार केला जाऊ शकतो का ? तसे दाखवणारे न्यायानिवाडे दाखवा ? अशी विचारणा न्यायालयाने आरोपींना केली होती. या पार्श्वभूमीवर गुरुवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी दोषमुक्तीच्या मागणीसाठी केलेली याचिका मागे घेत असल्याचे साध्वी आणि कुलकर्णी यांच्यातर्फे न्यायालयाला सांगण्यात आले. न्यायालयानेही आरोपींना याचिका मागे घेण्यास परवानगी दिली.

## ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकीचे नामनिर्देशन पत्र पारंपरिक पद्धतीने स्वीकारा

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**जळगाव जा :** वाढत्या थंडीत ग्रामपंचायत निवडणूकीने जोर धरला असून 28 नोव्हेंबर पासून संगणक प्रणालीद्वारे नामनिर्देशन पत्र दाखल करणे सुरू झाले आहे. जळगाव जामोद तालुक्यातील 19 ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडनुकांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून,संगणक प्रणालीद्वारे 28 नोव्हेंबर 2022 ते 2 डिसेंबर या कालावधीत उमेदवारी अर्ज भरण्याबाबात सुचणा दिल्या आहेत. निवडणूक आयोगाने महाराष्ट्र राज्य यांचे पत्र दिनांक 1 डिसेंबर 2022 चे निरदेशानुसार इच्छूक उमेदवार नामनिर्देशन पत्र भरण्यापासून वंचित राहू नये व त्यांना निवडणूक लढविण्याची संधी मिळावी त्यासाठी आयोगाने उमेदवारी अर्ज पारंपरिक पद्धतीने (आँफ लाईन) स्विकारण्याची परवानगी देण्यात आली आहे. तसेच नामनिर्देशन पत्र स्विकारण्याची वेळ 2 डिसेंबर 2022 रोजी साडेपाच वाजेपर्यंत वाढविण्यात आली आहे. जळगाव जामोद तालुक्यातील नामनिर्देशन पत्र भरू इच्छीनाऱ्या नागरिकांनी मा. निवडणूक आयोगाचे सुचणेप्रमाणे ज्या उमेदवारांची नामनिर्देशन पत्र संगणक प्रणाली द्वारे भरणे बाकी आहे अशा उमेदवारांनी पारंपरिक पद्धतीने नामनिर्देशन पत्र दाखल करण्याचे आवाहन तहसीलदार जळगाव जामोद एस.व्ही. सोलाट यांनी केले आहे.



# जुन्या घराच्या खरेदीनंतर आपोआप वीज कनेक्शन नव्या मालकाच्या नावावर

## 'ईझ ऑफ लिव्हिंग'साठी महावितरणचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज


**औरंगाबाद :** एखादे जुने घर किंवा दुकान खरेदी केल्यानंतर त्याचे विजेचे कनेक्शन जुन्या मालकाकडून नव्या मालकाच्या नावावर होण्यासाठीची ग्राहकांची धावपळ बंद होऊन आपोआप कनेक्शन धारकाच्या नावात बदल होण्यासाठी महावितरणने माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून नवीन व्यवस्था नुकतीच सुरू केली आहे. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या 'ईज ऑफ लिव्हिंग'च्या सूचनेनुसार हा उपक्रम यशस्वीपणे राबविल्याबद्दल महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.



एखाद्याने जुने घर किंवा दुकान खरेदी केले आणि त्यानुसार मुद्रांक शुल्क भरून संबंधित विभागाकडे नोंदणी केली की त्यानंतर त्या घराचे किंवा दुकानाचे विजेचे कनेक्शन जुन्या मालकाकडून आपल्या नावावर होण्यासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागत होता. या बदलासाठी महावितरणकडे अर्ज व सोबत कागदपत्रे दाखल करून प्रक्रिया शुल्क भरल्यानंतर कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून पडताळणी केली जात असे. महावितरणने यासाठी ऑनलाईन सुविधाही उपलब्ध केली आहे. त्यानुसार ऑनलाईन अर्ज भरून संबंधित कागदपत्रे अपलोड करता येतात. परंतु, या प्रक्रियेत कागदपत्रांच्या पडताळणीत वेळ जात होता. ग्राहकांना अनेकदा पाठपुरावा करावा लागत होता.



नव्या व्यवस्थेनुसार मुद्रांक शुल्क व नोंदणी विभागाशी महावितरणची आयटी सिस्टिम जोडली आहे. नोंदणी विभागात नव्या मालकाच्या नावाची प्रक्रिया पूर्ण झाली की, महावितरणला संदेश पाठविला जातो, त्यानुसार महावितरणकडून संबंधित ग्राहकाला एसएमएस पाठविला जातो व आवश्यक प्रक्रिया शुल्क भरण्यास कळविले जाते. हे शुल्क ग्राहक घरात बसून ऑनलाईनही भरू शकतो. फी भरली की विजेचे कनेक्शन नावावर होते आणि पुढच्या महिन्याचे विजेचे बिल नव्या मालकाच्या नावाने पाठविले जाते. एकापेक्षा अधिक व्यक्तींच्या नावे घराची खरेदी झाली असेल तर त्यांच्याशी संपर्क साधून कोणाच्या नावे वीज कनेक्शन ट्रान्स्फर करायचे याची निवड करण्यास सांगितले जाते. कारण विजेचे कनेक्शन एकच व्यक्ती किंवा संस्थेच्या नावे असू शकते. नव्या प्रक्रियेत वीज कनेक्शन नावावर होण्यासाठी स्वतंत्र अर्ज करणे, कागदपत्रे दाखल करणे, पडताळणी करणे व पाठपुरावा करणे हे सर्व कमी झाल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. नवीन व्यवस्थेची चाचणी नुकतीच यशस्वी झाली आहे. विजय सिंघल म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांचा 'ईज ऑफ लिव्हिंग'चा संदेश आहे. त्यानुसार योजना राबविण्याची सूचना मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. अशा प्रकारे ग्राहकांना वीज कनेक्शन आपोआप बदलून मिळण्यासाठीच्या प्रकल्पाचे काम ऑक्टोबर महिन्यात सुरू झाले. आता हा प्रकल्प पूर्ण झाला असून आता ग्राहकांना या नवीन सेवेचा लाभ घेता येणार आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## धन्यवाद हो धन्यवाद

आधुनिक केसरी

रोज रात्री झोपताना आज दिवसभर आपल्याला कोणाकोणाची मदत झाली त्यांची आठवण करून त्यांना धन्यवाद द्यायला हवेत. आपले पूर्वज बघा किती दूरदृष्टीचे होते ! सकाळी उठल्यावर भूमीबद्दलची कृतज्ञता म्हणून भूमीला नमस्कार, आईवडील, गुरुजनांना नमस्कार करायला आपली संस्कृती आपल्याला शिकवते. त्यांच्यासाठी एखादा विशिष्ट 'डे ' आपल्याकडे त्यांनी ठेवलेला नाही. धन्यवाद, कृतज्ञता रोजच व्यक्त करायची. आशीर्वाद रोजच घ्यायचे. मला मिळणारी हवा, अन्न, पाणी ज्यांच्यामुळे मी हे जीवन सुखकर जगू शकतो आहे त्या गोष्टीही धन्यवादास पात्र आहेत. तुमच्याकडे असणारी तुमची दोन चाकी, चार चाकी रोज तुम्हाला कुठे ना कुठेतरी घेऊन जात असते. सुरक्षित परत आणत असते. तिच्यामुळे तुमचा रोजचा प्रवास सुखकर होतो. ती सुद्धा आभारासाठी पात्र आहे !
मी आता स्वतःला एक सवय लावून घेतली आहे. ती म्हणजे जाणीवपूर्वक



सगळ्यांचे आभार व्यक्त करण्याची. मला पत्र आणून देणारा पोस्टमन किंवा कुरिअरवाला, दूधवाला अशी जी जी मंडळी मला सकाळपासून भेटतात, त्या त्या सर्वांचे जाणीवपूर्वक आभार मी मानतो. मी ज्या रिक्षातून प्रवास केला, त्या रिक्षावाल्याचे आभार मानतो. खरे तर मी त्याला पैसे दिलेले असतात. तरीही त्याने मला इच्छित स्थळी सोडल्याबद्दल मी आभार व्यक्त करतो. कृतज्ञता, आभार व्यक्त केल्याने त्या लोकांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद मला सुखावतो. प्रत्येक व्यक्ती म्हणजे परमेश्वराचे रूप आहे असे जर आपण मानत असू तर माझे आभार, कृतज्ञता त्या त्या व्यक्तीच्या हृदयस्थ परमेश्वरापर्यंत पोहोचते असे मी समजतो. काही दिवसांपूर्वी मी मिरजेला एका लग्नासाठी गेलो होतो. तिथून मला गावात एका मित्राकडे जायचे होते. तो मित्र स्वतः रिक्षा घेऊन मला घ्यायला आला. आम्ही त्याच्या घरी गेलो. आमच्या गप्पा, चहापाणी होईपर्यंत तो रिक्षावाला तिथे थांबून राहिला. परत मला सोडण्यासाठी मंगल कार्यालयापर्यंत आला. एव्हाना तसा त्याचा आणि माझा परिचय झाला होता. थांबल्याबद्दल मी त्याचे मनापासून आभार मानले. **क्रमशः**



## आनंदी पहाट

### पर्सोना म्हणजेच मुखवटा

आधुनिक केसरी

व्यक्तित्व म्हणजे वेगळं, निराळं अस्तित्व असलेली व्यक्ती. प्रत्येकास जन्मतः स्वतःचं असं व्यक्तित्व असतंच. या व्यक्तित्वावर सामाजिक परिस्थितीचा प्रभाव पडल्यावर व्यक्तित्वाचं व्यक्तिमत्वात रुपांतर होत असतं. एखाद्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व म्हणजे व्यक्ती जशी आहे तशी, म्हणजे व्यक्तीची शारीरिक ठेवण, बुद्धी, चारित्र्य, कर्तृत्व, गुण आदींचा समावेश त्यात होतो. व्यक्तीचा शारीरिक, भावनिक आणि सामाजिक विकास होत असतो. ह्या विकासातून तिचा पिंड घडत असतो. व्यक्तीचा हा घडलेला पिंड म्हणजे त्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व असतं. इंग्रजीत पर्सनेलिटी ही संज्ञा व्यक्तिमत्वास वापरतात. पर्सोना या शब्दापासून पर्सनेलिटी हा शब्द तयार झाला. पर्सोना म्हणजे मुखवटा; रोमन काळात नट तोंडावर मुखवटा घालून बोलत असत; अर्थातच जसं पात्र तसा मुखवटा. जसा मुखवटा तसा आवाज आणि भाषण. त्यामुळेच व्यक्तिमत्व म्हणजे बाह्य दर्शन असा अर्थ घेतला जात असतो. व्यक्तिमत्वाचा हा अर्थ एकांगी असल्याचं म्हंटलं तर निश्चितच वावगं ठरणार नाही. ह्यामध्ये व्यक्तीच्या स्वभाव वैशिष्ट्यांचा, बुद्धीचा, भावनांचा, गुणांचा आणि वृत्तीचा अंतर्भाव होत नसल्याचं स्पष्ट होतं. त्यामुळे ही व्याख्या परिपूर्ण होऊ शकत नाही. व्यक्तिमत्वात व्यक्तीची शरीरयष्टी, चेहरेपट्टी, ठेवण, बांधा, त्याची बुध्दिकौशाल्ये, क्षमता, अभिरुची, आवडनिवड, संपादित गुण इत्यादी बाबींचा प्राधान्यक्रमानुसार साकल्यानं विचार केला पाहिजे. ह्या सर्वांची व्यक्तीच्या जैविक देणगीपासून व्यक्तिजीवन जगण्यापर्यन्त झालेली वाटचाल म्हणजे व्यक्तिमत्व, असं म्हणल्यास ते व्यक्तिमत्वाच्या व्याख्येच्या दृष्टीकोनातून योग्य ठरू शकतं. कालांतरानं परिस्थिती अशी येते कि, आपण जिंकलोय कि हरलोय तेच कळत नाही. आपल्या अंतर्मनाला पडलेल्या प्रश्नाचं उत्तर सापडलं, असं ठरवणेच कठीण होतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### वैष्णव तो शोभे | विठ्ठलाचा ||

राम कृष्ण हरि | गोंदले हृदयी ||
ज्ञानाई तुकाई | मंत्र दिला ||१||

ध्यानी मनी एक | लागो मज छंद ||
आत्मा हो गोविंद | सर्वकाळ ||

मुखी घेता नाम | भेटे हा श्रीरंग ||
तोचि पांडुरंग | अंतरात ||३||

कर्म करोनिया | साधावा परमार्थ ||
संसार गुढार्थ | ज्ञाना सांगे ||४||

नामसंकीर्तन | भाग्यवंता लाभे ||
वैष्णव तो शोभे | विठ्ठलाचा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी

### माय लक्ष्मी

रत्नाकराची दुहिता। नारायणाची वल्लभा।
लक्ष्मीनामे गं प्रसिद्धा। माये वंदावे प्रारंभा।।
आसनी रक्त कमल। गती प्रसिद्ध चंचल।
आळत्याने पाय लाल। नयन ते निलोत्पल।।
माये येता गं सुंदर। माये जाता गं दरिद्र।
जुळवोनी दोहो कर। अष्टस्तव करी इंद्र।।
वेद गाती सूक्त तुझे। हिरणमयी रमा राजे।
चंद्रहास करी अर्जे। रहावे घरी माझे।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## देव अत्यंत दयाळू आहे



आधुनिक केसरी

तुम्ही फार कष्ट करून इथे येता. किती दगदग, किती त्रास तुम्हाला सोसावा लागतो ! बरे, इथे आल्यावर हाल काय कमी होतात ? परंतु इथे कशासाठी आपण येतो, आपल्याला काय हवे आहे, हे आपल्याला कळते का ? आपल्याला देव खरोखर हवासा वाटतो आहे का ? याचा विचारच आपण फारसा करीत नाही. आपल्यावर काही संकट आले, किंबहुना आपले काही वाईट झाले, की आपण म्हणतो, देवाने असे कसे केले ? असे म्हणणे यासारखे दुसरे पाप नाही. देवावर विश्वास न ठेवणारा माणूस यापेक्षा एकवेळ परवडला, कारण तो ' देवाने वाईट केले ' असे तरी म्हणणार नाही. देव खरोखर अत्यंत मायाळू आहे, त्याला कुणाचेही दुःख सहन होत नाही. कोणत्या आईला आपल्या मुलाला दुःख, कष्ट झालेले आवडेल ? म्हणून, देवाने माझे वाईट केले ही खोटी समजूत प्रथम मनातून काढून टाका. द्रौपदीला जेव्हा वस्त्रहरणासाठी दुःशासनाने भर सभेत खेचले, तेव्हा तिला वाटत होते की पांडवांना हे सहन होणार नाही, ते माझी विटंबना होऊ देणार नाहीत, ते दुःशासनाची खांडोळी करतील. तिला पांडवांबद्दल विश्वास वाटत होता. दुःशासनाने जेव्हा तिच्या पदराला हात घातला, तेव्हा तिने आशेने धर्माकडे पाहिले. धर्माला वाटले, आता विरोध केला तर आपले सत्याचे व्रत उघडे पडेल, म्हणून त्याने लाजेने मान खाली घातली. हे कसले अहंपणाने लडबडलेले सत्य ! तीच स्थिती इतर पांडवांची झाली. पुढे तिने भीष्माचार्यांकडे पाहिले, परंतु त्यांनीही मान खाली घातली. तेव्हा मात्र तिने जगाची आशा सोडली, आणि कळकळीने परमात्मा श्रीकृष्णाला हाक मारली; आणि त्याने अनेक वस्त्रे पुरवून तिची अब्रू रक्षण केली. पुढे तिला एकदा श्रीकृष्ण भेटला असताना तिने त्याला विचारले की, " आधीच तू माझ्या बचावासाठी का नाही धावलास ? तो दुष्ट, केस धरून मला खेचून नेत असतानाच का नाही धावलास ? " तेव्हा श्रीकृष्ण म्हणाला, " त्यात माझा काय दोष ? मी तुझ्या रक्षणासाठी आतुर होतो, परंतु तुला पांडवांची आणि इतरांची आशा होती, ते रक्षण करतील असे तुला वाटत होते. मला दरवाजा खुला नव्हता, मग मी कसा येऊ ? तू जगताची आशा सोडलीस आणि मला बोलावलेस, त्याबरोबर मी तुझ्या भेटीला धावलो. " जगाची आशा, आसक्ति सोडल्याशिवाय परमेश्वराला आपली हाक कशी पोहोचेल ? ज्या गोष्टीवर आपले प्रेम असते त्याच गोष्टीची आपल्याला नड लागते. आपल्याला देवाची नड लागली आहे का ? देवाचे प्रेम लागायला त्याच्या अखंड सहवासात राहण्याची अत्यंत जरूरी आहे; आणि हा सहवास जर कशाने साधत असेल तर तो एक त्याचे नाम घेतल्यानेच साधेल. भगवंताचे नाम घेऊन त्याचे प्रेम मिळवा, हेच माझे सांगणे.
**आजचे बोधवचन आहे - सर्व विसरून भगवंताला आळवले की तो कृपा करतो.**

## अध्यात्म आणि विज्ञान

आधुनिक केसरी

श्रुतींमध्ये अतिभौतिकीय गोष्टींबद्दल माहिती असते हे खरे मानले तरी त्यांतील बरीच वचने लौकिक, इंद्रियगोचर सृष्टीविषयीही असतात, आणि ही वचने खरी आहेत की नाहीत हे आपण वैज्ञानिक पद्धतीने निश्चित करू शकतो. उदा. सप्तसागर आहेत की नाहीत हे आपण वैज्ञानिक पद्धतीने निश्चित करू शकतो. उदा. सप्तसागर आणि सप्तलोकांचे जे. वर्णन श्रुतीत आढळते ते निखालस खोटे असल्याचे विज्ञानाने सिद्ध केले आहे. किंवा बायबलातील प्रतिपादनानुसार जगाची उत्पत्ती इ. स. पूर्वी ४००४ या वर्षी झाली हेही म्हणणे पूर्णपणे खोटे आहे. तेव्हा लौकिक बाबतीत अविश्वसनीय असणारे हे प्रमाण अलौकिक बाबतीत मात्र पूर्णपणे विश्वसनीय असेल हा संभव फारच कमी होतो. (२) दुसरी गोष्ट श्रुती अनेक आहेत. प्रत्येक धर्माची श्रुती वेगळी आहे आणि प्रत्येक श्रुती पारमार्थिक जगाचे वर्णन वेगळे देते. आता श्रुती प्रमाण मानायची तर सर्वच श्रुतींचा तो अधिकार आहे. परंतु सत्य, पारमार्थिक सत्यही, एकच असले पाहिजे, त्याचे स्वरूप परस्परविरुद्ध असू शकत नाही. हिंदूंचे वेद, ख्रिस्त्यांचे बायबल, मुस्लिमांचे कुराण, पारशांचे झेंद अवेस्ता आणि इतर अनेक धर्मग्रंथ अतिशय भिन्न, परस्परविरुद्ध गोष्टी सांगतात. त्या सर्वच खऱ्या असू शकत नाहीत; पण त्यांपैकी कोणत्या खऱ्या आणि कोणत्या खोट्या हे ठरविण्याचे कोणतेही श्रौत



साधन नाही. आणि अन्य साधन श्रुतीला मान्य होण्यासारखे नाही. या दोन कारणांस्तव शब्दप्रमाण ज्ञानसाधन म्हणून विश्वसनीय मानता येत नाही.
शब्दाच्या समर्थनार्थ असे म्हटले जाऊ शकेल की त्यात सांगितलेल्या सत्यांचा आपल्याला साक्षात्कार होऊ शकतो, आणि या प्रमाणे साक्षात्काराच्या साह्याने शब्दप्रमाणाचे समर्थन होऊ शकते. परंतु प्रामाण्याच्या बाबतीत जी अवस्था श्रुतीची आहे तीच अवस्था साक्षात्काराचीही आहे. साक्षात्काराला स्वतंत्र प्रामाण्य असेल तर त्याचे साह्य शब्दाला देता येईल, पण साक्षात्कार प्रमाण कशावरून मानायचे? ते भ्रामक नसतील कशावरून? निदान काही साक्षात्कार भ्रामक असले पाहिजेत हे साक्षात्कारांच्या विविधतेवरून सिद्ध होते. प्रत्येक आध्यात्मिक मताच्या अनुयायांना त्या मताच्या आशयाचा साक्षात्कार होतो, आणि आध्यात्मिक मते अनेक असल्यामुळे साक्षात्कारही अनेक आहेत. उदा. अद्वैत वेदांत्याला अहं ब्रह्मास्मि' असा सच्चिदानंदात्मक साक्षात्कार होतो, तर विशिष्टाद्वैत्याला आपण ईश्वराचे अंश आहोत असा साक्षात्कार होतो, आणि सांख्याला सुखदुःखराहित्याचा कैवल्यात्मक साक्षात्कार होतो परंतु हे सर्वच साक्षात्कार यथार्थ असू शकत नाहीत. पण प्रत्येक साक्षात्काराचा दावा आपण यथार्थ आहोत असाच असतो. त्यामुळे कोणता साक्षात्कार प्रमाण आणि कोणता अप्रमाण हे ठरविणे अशक्य आहे. साक्षात्कारासंबधी दुसरीही एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. साक्षात्कार होण्यापूर्वी साधकाला दीर्घ साधना करावी लागते. या साधनेचे स्वरूप आत्मसंमोहनाचे आहे असे म्हणणे भाग आहे, 'अहं ब्रह्मास्मि' किंवा 'तत्त्वमसि' किंवा 'सर्वं खल्विदं ब्रह्म' या महावाक्यांचा जप जर आपण दिवसचे दिवस, नव्हे महिनेच्या महिने आणि वर्षेच्या वर्षे करीत राहिलो तर शेवटी आपल्याला तशी अनुभूती येणे स्वाभाविक आहे असे म्हणावे लागेल. आपण ज्या प्रकारचे ध्यान करू त्या प्रकारचा साक्षात्कार होतो. म्हणून साक्षात्काराने श्रुतिवचनाचे समर्थन होऊ शकत नाही. उलट श्रुतिवचन श्रद्धेने स्वीकारून त्याचे सतत चिंतन केल्याने त्याचा साक्षात्कार होतो. एका प्रमाणाला दुसऱ्या प्रमाणाचे साह्य होण्याकरिता दुसऱ्याला स्वतःचे स्वतंत्र प्रामाण्य हवे. परंतु येथे शब्द आणि साक्षात्कार या दोहोंनाही स्वतःचे प्रामाण्य नसल्यामुळे त्यांनी परस्परांना साह्य करणे यात अन्योन्याश्रयाचा दोष मात्र होतो.
**क्रमशः**

दि. य. देशपांडे

# औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजनेच्या कामांना गती द्यावी

## फडणवीस : केंद्रीय अर्थ राज्यमंत्री कराड यांच्या उपस्थितीत आढावा बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजनेच्या (शहरी) कामांना गती देण्यात यावी असे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.
प्रधानमंत्री आवास योजनेच्या (शहरी) औरंगाबाद महानगरपालिका स्तरावरील कामासंदर्भात आढावा बैठक केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ भागवत कराड यांच्या उपस्थितीत झाली. यावेळी सहकार मंत्री अतुल सावे, गृहनिर्माण विभागाच्या प्रधान सचिव वल्सा नायर-सिंह, नगरविकास विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी, जिल्हाधिकारी अस्तिककुमार पांडेय, महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड म्हणाले, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात पात्र लाभार्थ्यांना घरे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यासंदर्भात बॅंकांनी अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याचे आवाहनही करण्यात आले असल्याचे डॉ. कराड यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना घरे उपलब्ध करून देण्यात यावीत. ही योजना राबविताना तेथे उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधांचाही बारकाईने विचार करण्यात यावा असे निर्देश फडणवीस यांनी दिले. या योजनेच्या सद्य स्थितीसंदर्भात यावेळी सादरीकरण करण्यात आले. तसेच योजनेस गती देण्यासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत आवश्यक असणा-या मुद्द्यांवरही यावेळी चर्चा झाली.



# लढण्यासाठी जाग येत नाही..??



कांद्याचं निघत होतं सालपट
तेव्हा द्राक्ष हसत होती
केळी झोडली पावसानं
तेव्हा संत्री बारमध्ये बसत होती
मका, सोयाबीन, कपाशी
या टाकून दिलेल्या पोरींसारख्या
माय बापाच्या घरात राहून सुद्धा
भावाच्या प्रेमाला पारख्या..
ऊस गोड ..तसा आडदांड
वेळ आली की खमक्या होतो
गोडवाच काढून घेऊ तुमचा
नादी लागाल तर धमक्या देतो..
मेथी , कोथंबीर, काकडी , दोडकी
नावाला भाजीपाला ..
पण बाजारात पालापाचोळा
वांग्याचं नेहमीच होतं भरीत
तांबट्याचा रस्त्यावर चिखल गोळा...
धान्य भरडलं जातंय जात्यात
पण कोणालाच राग येत नाही
सडून.. करपून
नाहीतर फास लावून मरताय सगळे
पण लढण्यासाठी जाग येत नाही.. ??

संदीप जगताप,
मु.पो चिंचखेड,
ता. दिंडोरी,
नाशिक-
मो. ७२१८६२५९६०

(कवी स्वाभिमानी शेतकरी संघटना प्रदेशाध्यक्ष आहेत)

# नाशिकचे तत्कालीन पोलीस अधीक्षक, तहसीलदार व कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

> रेशन धान्याच्या काळाबाजार प्रकरणी गडगडसांगवीत दुकानदाराला पथकाने मुद्देमालासह पकडण्यात आले होते . संपूर्ण पडताळणी करूनच गुन्हा दाखल करण्यात आला होता . त्याचा काऊंटर ब्लास्ट म्हणून अर्जदाराने अतिरिक्त सत्र न्यायालयात अर्ज केला . याप्रकरणी अधिकृत कर्तव्य पार पाडणाऱ्या अधिकाऱ्यांवरच गुन्हे दाखल करण्याचा आदेश न्यायालयाने दिला . या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे . अशा तक्रारदारांच्या अर्जावरून प्रामाणिक शासकीय नोकरांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्याची परवानगी मिळत गेली, तर सरकारी कर्मचाऱ्यांना आपले कर्तव्य मुक्तपणे व न्यायिक पद्धतीने पार पाडणे कठीण होईल .
> **सचिन पाटील, तत्कालीन पोलीस अधीक्षक**

**शिरवाडे वाकद :** धान्य काळाबाजार प्रकरणात एका दलित कुटुंबाला शिवीगाळ प्रकरणी चक्क गत पोलीस अधिक्षकांवरच गुन्हा दाखल झाल्याचा प्रकार नाशिक जिल्ह्यात घडला असून या प्रकाराने जिल्हाभर खळबळ उडाली आहे. इगतपुरी तालुक्यातील गडगडसांगवीतील स्वस्त धान्य दुकानातील माहे ऑगस्ट २०२२ मध्ये बेकायदेशीरपणे धान्य विक्री होत असल्याबाबत महसूल, पुरवठा तसेच पोलीस अधिकारी पथकाने तेथील गोपाळ दगडू लहांगे (वय ४८) यांच्या कुटुंबावर कारवाई करून जीवनावश्यक वस्तू कायद्यान्वये गुन्हा दाखल केला होता. याबाबत पोलीस स्टेशनला विचारणा करण्यास गेलेल्या लहांगे कुटुंबातील सदस्यांना जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप करत लहांगे यांनी न्यायालयात धाव घेतली व न्यायालयाच्या आदेशाने संबंधीतांवर गुन्हे दाखल झाले आहेत. आरोपी आदिवाशी आहेत हे माहिती असतांना देखील डॉ.प्रदीप पवार व पोलीस अधिक्षक सचिन पाटील यांचे विरोधात जमिनीच्या वादात मदत केल्याचा वचपा काढण्याच्या हेतूने व जातीय द्वेषातून आरोपी १ ते ७ यांनी फिर्यादीचा मुलगा व पत्नी यांनी कोणत्याही प्रकारचे गुन्हे केलेले नसतांना देखील कुठल्याही प्रकारचा शहानिशा न करता पदाचा गैरवापर करून फिर्यादीची पत्नी विरुद्ध भरत भावसार यांचे मार्फत वाडीवर्हे पोलीस स्टेशनमध्ये दि.३१ ऑगस्ट २२ रोजी गु र नं.१२९/२०२२ अन्वये जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३ व ७ प्रमाणे तसेच भादंवी ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला. त्याचबरोबर अनिल पवार यांनी पोलीस स्टेशन आवारात जोरजोरात जातीवाचक शिविगाळ केली व प्रभाकर खांदवे यांनी मुलगा सागर यास हात पिरगाळत जातीवाचक शिवीगाळ केली. त्यामुळे फिर्यादी लहांगे यांनी मा.अपर जिल्हा व सत्र न्यायालय -२ यांचेकडेस फौजदारी किरकोळ अर्ज २४५/२०२२ अन्वये दाखल केला होता. न्यायालयाने हा अर्ज मंजूर करत दि.२९ नोव्हेंबर २०२२ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १५६ (३) अन्वये गुन्हा दाखल करून घेणेबाबत पोलीस निरीक्षक वाडीवर्हे पोलीस स्टेशनला आदेश दिल्याने अनिल शिवाजी पवार पो.निरीक्षक, प्रभाकर बाबुराव खांदवे, पोलीस कर्मचारी, परमेश्वर अंकुशराव कासुळे तहसीलदार, भारत श्रावण भावसार, पुरवठा निरीक्षक, बी.आर.ढोणे,पुरवठा अधिकारी, सचिन अशोक पाटील, पोलीस अधिक्षक, डॉ.प्रदीप नारायण पवार यांचेवर गु.र.नं.१९६/२०२२ अनु.जाती व जमाती अन्याय अत्याचार प्रतिबंधात्मक कायदा १९८९ चे कलम ३(१) (P,Q,R,S) प्रमाणे तसेच १८६० चे कलम १९३, २०३, २०५, २१९, २२०, ३२३, ५०४ व ३४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

# भाजपाचा खरा चेहरा उघड : पटोले

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत परंतु या दैवताचा भारतीय जनता पक्ष वारंवार अपमान करत असून यातून भाजपाचा खरा चेहरा उघड झाला आहे. राज्यापाल कोश्यारी, भाजपाचा प्रवक्ता सुधांशु त्रिवेदी यांच्यानंतर आता राज्यातील मंत्री मंगलप्रभात लोढा यांनीही महाराजांबद्दल गरळ ओकली आहे. सत्तेत असलेल्या आमदार व खासदार यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल जर थोडासाही स्वाभीमान शिल्लक असेल तर त्यांनी या अपमानाबद्दल तात्काळ राजीनामे द्यावेत, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.
गांधी भवन येथे पत्रकारांशी संवाद साधताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपाचा समाचार घेतला. ते पुढे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे भारतीय जनता पक्षाला फक्त निवडणुकीत मते मिळवण्यासाठीच हवे आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी व तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अरबी समुद्रातील महाराजांच्या स्मारकाचा मोठा गाजावाजा करत इव्हेंटही केला होता. निवडणुकीत छत्रपतींचा आशिर्वाद घेऊन मतेही मागितली पण सत्तेत येताच भाजपाच खरा चेहरा बाहेर आला. छत्रपती शिवाजी महाराज यांनी औरंगजेबाची पाच वेळा माफी मागितली असे निर्लज्जपणे भारतीय जनता पक्षाचा प्रवक्ता सुधांशु त्रिवेदी म्हणतो. राज्यपाल कोश्यारी यांनी तर महाराज जुने झाले असे म्हणत गडकरींशी तुलना केली. हे कमी होते की काय म्हणून राज्याचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी महाराजांच्या आग्रा सुटक्याची तुलना राज्यातील एका पक्षातील बंडखोरांशी केली, हीच भाजपाची महाराजांबद्दलची भूमिका आहे हे स्पष्ट झाले आहे. हे अत्यंत निर्लजपणाचे लक्षण असून आता माफी मागून सारवासारव केली जात आहे पण अशा प्रवृत्तींना माफी नाहीच, याचे प्रायश्चित त्यांना भोगावेच लागेल. भाजपाकडून छत्रपती शिवाजी महाराजांचा वारंवार केला जात असलेल्या अपमानाबद्दल जनतेत प्रचंड संताप आहे, महाराष्ट्राची जनता हे कदापी खपवून घेणार नाही.
अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना केंद्र सरकार शिष्यवृत्ती देत नसेल तर राज्य सरकारने द्यावी. इयत्ता पहिली ते आठवीत शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना केंद्र शासनाकडून दरवर्षी देण्यात येणारी शिष्यवृत्ती सरकारने अचानक बंद करण्यात आली आहे. सरकारने विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेतले पण आता ही शिष्यवृत्तीच बंद करण्यात आली आहे. राज्यातील १३ लाख विद्यार्थ्यांना याचा फटका बसला आहे. यात फक्त मुस्लीम समाजाचेच विद्यार्थी नाहीत तर शिख, पारशी, ख्रिश्चन, जैन, बौद्ध समाजाच्या विद्यार्थ्यांचाही समावेश आहे.

# शेतकऱ्यांकडून सक्तीने वीज बिल वसुली विरोधात शिवसेना आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शेतकऱ्यांकडून सक्तीने वीज बिल केली जात आहे व पीकविमा कंपनीचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे, शेतकऱ्यांना अजून अतिवृष्टीची भरपाई मिळाली नाही या शेतकरी विरोधी सरकारच्या विरोधात शिवसेना आक्रमक झाली असून आज गंगापूर तालुक्यातील इसारवाडी फाटा रस्त्यावर विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली आज (१ डिसेंबर) चक्का जाम आंदोलन करण्यात आले. यावेळी संतप्त शिवसैनिकांनी रस्त्यावर चारा जाळून सरकारचा निषेध व्यक्त केला. यावेळी आंदोलक शिवसैनिकांनी "शेतकऱ्यांना अतिवृष्टीची मदत मिळालीच पाहिजे", "सक्तीची वीज वीज बिल वसुली थांबलीच पाहिजे", "शेतकऱ्यांच्या खात्यावर विमा रक्कम जमा करा नाहीतर शेतकरी विरोधी सरकार चालते व्हा" या घोषणा देत मींधे सरकारचा निषेध केला. अंबादास दानवे यांच्यासह शिवसैनिकांनी रस्त्यावर ठिय्या आंदोलन करताच पोलिसांनी कारवाई करत अंबादास दानवे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. यावेळी विरोधी पक्षनेता अंबादास दानवे यांनी अस्मानी संकटात शेतकरी त्रस्त असताना शिंदे - फडणवीस सरकार कोणत्याही शेतकऱ्याची वीज कनेक्शन तोडणार नाही, अतिवृष्टीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पीक विमा लवकरच मिळेल, असे सांगण्यात येत असून मुळात एकही आश्वासन पूर्ण केले नाही. सरकारला जागे करण्यासाठी शिवसेना आक्रमक पवित्रा घेत रस्त्यावर उतरली आहे. शिंदे- फडणवीस सरकारने मागण्या मान्य कराव्या नसता राज्यभरात तीव्र आंदोलन या सरकारच्या विरोधात करण्यात येणार असल्याचा इशारा दिला.

# भोकरचा भुयारीपूल खुला करण्याची मागणी

## वाहनधारकांची हेळसांड

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** शहरातून जाणारा मुख्य रस्ता हा राष्ट्रीय महामार्ग असल्याने वाहनाची वर्दळ आणि याच मार्गावर रेल्वे गेट यामुळे वाहतूकीस अडथळा निर्माण होत असे.रेल्वे उड्डाण पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला असला तरी भुयारी पूलाचे काम रखडल्याने नागरीकाची डोकेदुखी वाढली आहे. सदरील भुयारी पूल त्वरीत खूला करण्यात यावा अशी मागणी अल्पसंख्याक तालूका कॉंग्रेस अध्यक्ष मिर्झा ताहेर बेग यांनी केली आहे.
प्रारंभी शहरातून जाणारा मुख्य रस्ता हा विशेष प्रकल्प विभागाकडे होता.शासनाटडुन राष्टीय महामार्ग म्हणून मंजुरी मिळाल्यानंतर रस्त्यावर विविध विकासात्मक स्वरूपाची कामे करण्यात आली. विशेष प्रकल्पाचे नामांतर करून राष्ट्रीय महामार्ग विभाग असे करण्यात आले आहे.रस्ते विकासासाठी केंद्र सरकारने कोट्यावधी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. आता तालुक्यातील बहुतांश रस्ते चकचकीत झाले आहेत. शहरातुन जाणारा मूदखेड- आदिलाबाद रेल्वेमार्ग याच मार्गावर असून तिथे रेल्वे गेट आहे.मुख्य रस्त्यावरील राष्ट्रीय महामार्ग आणि रेल्वे गेट याचा संगम झाल्याने तासनतास वाहतुकसेवा ठप्प होत असे याची गंभीर दखल घेऊन शहरात रेल्वे उड्डाणपूल आणि बाह्यवळण रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला त्यामुळे वाहतुकीची समस्या दूर झाली आहे. रेल्वे उड्डाणपूलाच्या खाली भूयारी पूल बांधण्यात आले आहे. त्याचे काम कासवगतीने अद्याप सूरू आहे.परिणामी वाहनधारकांची डोकेदुखी वाढली आहे.पावसाळ्यात पडलेले पाणी भुयारी पूलात साचल्याने परिसरात दूर्गंधी पसरून नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. संबधीत विभाग आणि कंत्राटदारांनी रखडलेल्या भूयारी पुलाचे काम त्वरित पूर्ण करून नागरीकांची होणारी गैरसोय दूर करावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ताहर बेग यांनी दिला आहे.

# रवीश कुमार

आधुनिक केसरी

NDTV चे अँकर आणि पत्रकार रवीश कुमार यांनी राजीनामा दिल्यानंतर माध्यम विश्वात आणि सोशल मीडियावर त्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. अदानी समूहाने एनडीटीव्हीचा ताबा घेतल्यानंतर बुधवारी एनडीटीव्हीचे संस्थापक-प्रवर्तक प्रणॉय रॉय आणि राधिका रॉय यांनी राजीनामा दिला. त्यापाठोपाठ रवीश कुमार यांनीही राजीनामा दिल्याची माहिती एनडीटीव्हीकडून देण्यात आली. या पार्श्वभूमीवर रवीश कुमार यांच्या फॉलोअर्सकडून सोशल मीडियावर एनडीटीव्ही व्यवस्थापनाचा निषेध केला जात आहे. त्यात आता राजीनाम्यानंतर पहिल्यांदाच रवीश कुमार यांनी ट्वीटरच्या माध्यमातून प्रतिक्रिया दिली आहे. रवीश कुमार हे गोल्या २६ वर्षांपासून एनडीटीव्हीशी संलग्न होते. १९९६ साली पहिल्यांदा त्यांचा एनडीटीव्हीशी संपर्क आला. तेव्हापासून त्यांनी आपली पत्रकारिता आणि वृत्तांकनाच्या माध्यमातून समाजातून मोठा पाठिंबा मिळवला. सामान्यांचे प्रश्न मांडण्याची त्यांची हातोटी विशेषत: तरुणांमध्ये प्रचंड चर्चेचा विषय ठरली होती. 'रवीश की रिपोर्ट' किंवा 'प्राईम टाईम' शोच्या माध्यमातून त्यांनी अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांना वाचा फोडली. मात्र, त्यांच्या राजीनाम्यामुळे माध्यम विश्वात चर्चा सुरू झाली आहे. राजीनाम्यानंतर रवीश कुमार यांनी एका ट्वीटच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. या ट्वीटच्या शेवटी त्यांनी नेहमीप्रमाणे 'आपका रवीश कुमार' असे नमूद केले आहे. या ट्वीटमध्ये NDTV चा राजीनामा दिल्यानंतर ते कोणत्या माध्यमातून सगळ्यांशी संवाद साधणार आहेत, त्याविषयीही त्यांनी माहिती दिली आहे. माननीय जनता, माझ्या असण्यामध्ये तुम्हीही सहभागी आहात. तुमचे प्रेम हीच माझी खरी संपत्ती आहे. आत्तापर्यंत तुम्हा प्रेक्षकांशी प्रदीर्घकाळ आणि एकतर्फी संवाद साधला आहे. आता माझ्या यूट्यूब चॅनलवर. हाच माझा नवा पत्ता आहे. सर्वांना गोदी मीडियाच्या गुलामीशी लढा द्यायचा आहे, असे रवीश कुमार यांनी या ट्वीटमध्ये म्हटले आहे. या ट्वीटमध्ये रवीश कुमार यांनी त्यांच्या यूट्यूब चॅनलची लिंकदेखील शेअर केली आहे. अदानी समूहाने एनडीटीव्हीचे मालकीहक्क घेण्याची प्रक्रिया काही दिवसांपूर्वीच पूर्ण झाली. त्यानंतर प्रणॉय रॉय आणि राधिका रॉय राजीनामा देणार असल्याची चर्चा सुरू झाली होती. मात्र, त्याबाबत अधिकृत भूमिका समोर येत नव्हती. अखेर बुधवारी त्या दोघांनीही राजीनामा दिल्यानंतर रवीश कुमार यांनीही राजीनामा दिल्याचं एनडीटीव्हीकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

# डॉ. नागनाथ कोतापल्ले: मराठवाड्याचे वाङ्मयीन अध्वर्यू !

आधुनिक केसरी

**मराठी वाङ्मयाच्या साठोत्तरी मांदियाळीतील जेष्ठ लेखक, कवी, समीक्षक, कथा-कादंबरीकार माजी कुलगुरू डॉ.नागनाथ कोतापल्ले सरांच्या निधनाची बातमीने खूप दु:ख झाले! एक एक प्रेमळ मनाचा सहृदय शिक्षक म्हणजेच आज आपल्यातून निघून गेला! माध्यमांवर सर्वत्र सरांच्या आजी-माजी विद्यार्थ्यांचे, जेष्ठ-श्रेष्ठ लेखक-साहित्यिकांचे शोक संदेश वाचतांना अक्षरशः मन हेलावून गेले! विकासापासून वंचित असणाऱ्या मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्याच्या दुर्गम भागातून आलेला एक लेखक आज काळाच्या पडद्याआड गेला! महाराष्ट्राच्या इतिहासांत मराठवाड्याने भरीव योगदान दिले, परंतु विकासाच्या बाबतीत मराठवाड्याच्या वाट्याला नेहमीच उपेक्षित जीनं आलं!**


अनेक नेत्यांनी महाराष्ट्राला विकासाच्या शिखरावर नेऊन ठेवल्यानंतर वाढून घ्यायच्या वेळेला त्यांनी जगाचा निरोप घेतला! आद्य कवयित्री संत जनाबाई, वारकरी संप्रदायाचे आद्य प्रवर्तक संत नामदेव, पासोडीकार दासोपंत आदि कवी अजूनही उपेक्षितांचं जिणं जगताहेत. त्याचबरोबर स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठवाड्यातील अनेक तत्वज्ञ, कवी, लेखक, नाटककार, लोककवी, कलावंत, प्रबोधनकार, कादंबरीकारांनी उपेक्षिताचं जगणं अनुभवलेलं आहे हे वेगळं सांगण्याची गरज नाही. शहरी झगमगाटात गुंगून गेलेलं लेखनविश्व कधी मराठवाड्यात विसावलंच नाही! रंगविलेल्या बटबटीत, गडद सौंदर्यानं कधी गावरान-ग्रामीण निखळ सौंदर्य अनुभवलंच नाही! ते कायम उपेक्षित राहिलं! याच उपेक्षित महानुभावांच्या मांदियाळीतील एक नाव म्हणजे कवी-कुलगुरू डॉ.नागनाथ कोतापल्ले! कविवर्य डॉ.नागनाथ कोतापल्ले सरांच्या जीवन-जगण्याचा इतिहास त्यांच्या साहित्यातून दृगोचर होतांना त्यांचे लेखनभावविश्व हे तंत्रापेक्षा आशयाला महत्व देतांना समाजाला त्याचा खराखुरा आरसा दाखवण्याचे नित्य कार्य करते. कविवर्य लक्ष्मीकांत तांबोळी सरांकडून कवितेचे बाळकडू घेतलेले कोतापल्ले इथल्या व्यवस्थेची लक्तरं वेशीवर टांगून इथल्या प्रस्थापितांना सडेतोड प्रश्न विचारून पळताभुई थोडी करतात. स्वातंत्र्याच्या आसपास जन्मलेल्या कोतापल्ले सरांनी बहात्तरच्या दुष्काळाच्या झळाबरोबरच गरिबी, जातिभेदाचे खोलवर चटके सोसले होते! याचा परिणाम असा झाला की; त्यांची लेखणी महात्मा ज्योतीराव फुल्यांचा आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा वसा-वारसा सांगते. साठोत्तरी मराठी वाङ्मय विश्वात सर्वच क्षेत्रांत कोतापल्ले सरांनी आपले भरीव योगदान देतांना आपल्या मूळ विचारांच्या बैठकीशी कधीही प्रतारणा केलीं नाही. त्यांचा पहिला आणि एकमेव असलेला 'मूड्स' हा कविता संग्रह आणि त्यातील कविता त्यांच्या लेखनाचे भावविश्व सहज प्रकट करतांना हा कवी मराठी सास्वतांच्या मांदियाळीत नक्की जाऊन बसणार याची मनोमन साक्ष पटते.

कोणत्याही कवीची कविता ही त्याच्या अंतकरणाचे निखळ भाव असते. सत्तरीत त्यांची

हे शहर म्हणजे एक प्रचंड अजगर आहे.
येथे जगण्यासाठी मरणाची तिरडी आळवावी लागते

अशा आशयाची कविता सुर्वे, चित्रे, महानोर, ग्रेस, तांबोळी यांच्या कवितेची जातकुळी सांगून जाते. नवनवी जीवनक्षितिजे समाजात प्रतिबिंबित होतांना समजातील दुःख, वेदना आणि वैफल्यग्रस्तता इत्यादी मूल्याची पेरणी करतांना त्यांची कविता स्वतःची नवी वाट निर्मिते. त्यांच्या एकाच कविता संग्रहात आशयाची उंची आणि भावनांची मर्मग्राह्यता ओतप्रोत भरलेली आढळते.

एकुलता एक कवितासंग्रह प्रकाशित केल्यानंतर कोतापल्ले सर इतर वाङ्मयीन लेखन प्रकाराकडे वळले. त्यांच्या मनातील भावभावनांना विस्ताराने व्यक्त होण्यासाठी कवितेचा परीघ छोटा वाटत असावा, परिणामी सर इतर साहित्य प्रकारात लिहू लागले. कोतापल्ले सरांची जडणघडण प्रथितयश साहित्यिकांमध्ये झाल्यामुळे त्यांचे लेखन आशय-विषय संपन्न झाले. देगलूर येथे महाविद्यालयीन स्तरावर प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी आणि औरंगाबाद येथील तेंव्हाच्या मराठवाडा विद्यापीठ स्तरांवर नामवंत साहित्यिक प्रा.वा.ल.कुलकर्णी, प्रा.यु.म.पठाण, डॉ.सुधीर रसाळ, डॉ.गो. मा. पवार या दिग्गजांचा सहवास लाभला. त्याशिवाय आंबेडकरी साहित्याचे हृदयस्थ गुरुवर्य डॉ.गंगाधर पानतावणे सरांचा स्नेहबंध त्यांना आणखीनच समृद्ध करून गेला. गावाकडील शेती-मातीचे अनुभव असणारे नागनाथ कोतापल्ले कथा लेखनामध्ये गढून गेले. एकीकडे बीडच्या बंकटस्वामी वरिष्ठ महाविद्यालयात मराठी विषयाचे अध्ययन-अध्यापन करतांना ग्रामीण भागातील लोकांचे प्रश्न त्यांना स्तंभित करायचे. बीड हा मागास, उसतोड कामगारांचा जिल्हा आणि कोतापल्ले सर शेतकरी कुटुंबातून आलेले, परिणामी त्यांची नाळ पटकन बीड परिसराशी जुळली. अत्यंत खंबीर व निर्भय स्वभावाच्या कोतापल्ले सरांना अनेक संधी चालून आल्या. त्यातच ते औरंगाबादच्या मराठवाडा



विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले आणि खऱ्या अर्थाने त्यांचा वाङ्मयीन प्रवास सुरु झाला. १९८० नंतरच्या मराठी कथेतील भास्कर चंदनशिव, आनंद पाटील, प्रतिमा इंगोले, बाबाराव मुसळे या प्रथितयश कथाकारांच्या पंगतीत डॉ.नागनाथ कोतापल्ले जाऊन बसतात. ऐंशीच्या दशकांत देशात विकासाने जोर धरला आणि याचे पर्यवसान धर्म, संस्कृती, परंपरा, कौटुंबिक नात्यांची पडझड होण्यात झाले. माणसाने आत्मकेंद्रित विश्व निर्माण केले आणि समाजाच्या आनंदाचा डोल्हारा कोसळायला प्रारंभ झाला. पती-पत्नीचे संबंध स्त्री-पुरुषाचे संबंध झाले आणि कुटुंब विभक्ततेचे प्रमाण वाढायला लागले. या सर्वच बदलत्या सामाजिक कंगोऱ्याचे चित्रण डॉ.कोतापल्ले सरांच्या कथांमधून आपणास वाचायला-अनुभवायला मिळते. आपले विलक्षण अनुभव प्रतिमा आणि प्रतीकांच्या सहाय्याने मोठ्या विलोभनीय पद्धतीने मांडून आपल्या कथेची मांड समाज आणि वाचकाच्या मनावर घट्ट करून जातात. मानवी व्यथा, वेदना, विसंगती, शून्यता, न्यूनता, एकाकीपण, दुख, कष्ट, अनोळखीपणा, दारूनता, ढासळती सामाजिक मुल्ये हे त्यांच्या कथांमध्ये पावलोपावली अनुभवायला मिळते. याशिवाय कोतापल्ले सरांनी दीर्घकथा, कादंबरी, ललित गद्य, समीक्षा अशा सर्वचवाङ्मयीन परिपेक्षामध्ये आपले अमूल्य योगदान दिलेले आढळून येते. 'कर्फ्यू आणि इतर कथा', 'रक्त आणि पाऊस', 'संदर्भ', 'कवीची गोष्ट', 'सावित्रीचा निर्णय', 'देवाचे डोळे' हे कथासंग्रह, 'राजधानी' हा दीर्घकथा संग्रह, 'मध्यरात्र', 'गांधारीचे डोळे', 'प्रभाव' या कादंबऱ्या, 'पापुद्रे', 'ग्रामीण साहित्य :स्वरूप आणि बोध', 'नवकथाकार शंकर पाटील', साहित्याचा अन्वयार्थ', 'मराठी कविता : एक दृष्टिक्षेप', 'साहित्याचा अवकाश' आदि समीक्षणात्मक ग्रंथ, 'गावात फुले चांदणे' ही प्रौढ लघुकादंबरी, 'मराठी साहित्य संमेलने आणि सांस्कृतिक संघर्ष', 'उद्याच्या सुंदर दिवसासाठी' हे ललित गद्य ग्रंथ , 'जोतीपर्व'अनुवादित ग्रंथ आणि 'स्त्री-पुरुष तुलना', 'शेतकऱ्यांचा आसूड', 'पाचोळा आणि दहा समीक्षक', 'निवडक बी रघुनाथ' आदि महत्वपूर्णवाङ्मयीन कलाकृतींचे संपादन करण्याचे भीष्मकार्य डॉ.कोतापल्ले सरांनी आपल्या तहहयातीत केले. त्यांना विविध पाच पुरस्कारांनी गौरवले गेले. आज आदरणीय कवी-कुलगुरू डॉ.नागनाथ कोतापल्ले सर आपल्यात नाहीत ही मोठी दुःखद बाब आहे. मराठी वाङ्मयीन परीघ विस्तारण्यासाठी सरांचे अत्यंत मोलाचे योगदान लाभले असले तरी म्हणावा तेव्हढा त्यांच्या लेखनाचा उहापोह झाला नाही हे मोठ्या धाडसाने म्हणावे लागते. आज नव्या पिढीने त्यांच्या सर्वच लेखनाचा धांडोळा घेऊन त्यावर अनेक समीक्षणात्मक लेखन होणे क्रमप्राप्त आहे. त्याचबरोबर 'समग्र नागनाथ कोतापल्ले' नावाचा एक ग्रंथ महाराष्ट्र शासनाने प्रकाशित करणे अगत्याचे आहे. असे झाल्यामुळे येणाऱ्या पिढ्यांना मराठवाड्याच्या या भूमिपुत्राच्या वाङ्मयाची विस्ताराने ओळख होईल. नव्या पिढीतील अनेक वाचक-लेखक-संशोधक डॉ.कोतापल्ले सरांच्या वाङ्मयावर संशोधन करतील. यातूनच १९६० नंतरच्या मराठवाड्याची ओळख कायम राहील! असा समग्र ग्रंथ शासनाने प्रकाशित करून स्मृतिशेष डॉ.नागनाथ कोतापल्ले या मराठवाड्याच्या भूमिपुत्राचा सन्मान करावा, हीच खऱ्या अर्थाने आदरणीय गुरुवर्य डॉ. कोतापल्ले सरांना खरी श्रद्धांजली असेल! जय हिंद! **(टीप: लेखक हे व्याख्याता, कवी, कीर्तनकार, समीक्षक, योग-प्राणायाम प्रशिक्षक आहेत.)**



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# मराठी भाषेला समृद्ध करणारे साहित्यिक

आधुनिक केसरी

**मराठीतील जेष्ठ साहित्यिक, विचारवंत नागनाथ कोत्तापल्ले सद यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले. नागनाथ कोत्तापल्ले सर गेली काही दिवस आजारी होते. बुधवारी ३० नोव्हेंबर रोजी पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वाची मोठी हानी झाली आहे. मराठी साहित्य विश्वातील प्रथितयश साहित्यिक म्हणून ओळखले जाणारे नागनाथ कोत्तापल्ले यांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या गावी झाली. नागनाथ कोत्तापल्ले यांचे शालेय शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. १९६९ साली कोत्तापल्ले सरांनी देगलूर येथून बी ए ची पदवी मिळवली.**



बी ए ची पदवी मिळवताना ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम ए पूर्ण केले आणि १९८१ साली यु. म. पठाण सरांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव पाटील यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास या विषयावर पिचडी मिळवली. १९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. अध्यापक म्हणून विद्या दानाचे पवित्र कार्य करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. नागनाथ कोत्तापल्ले १९७७ मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते. त्यांनतर ते पुणे विद्यापिठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५ पासून २०१० पर्यंत कोत्तापल्ले सर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी १९७० पासून लेखनास सुरवात केली. मुड्स हा त्यांचा कविता संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर कर्फ्यु आणि इतर कथा व संदर्भ हे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले. कवीची गोष्ट आणि सावित्रीच्या लेकी या त्यांनी लिहिलेल्या दीर्घ कथा त्या काळात खूप गाजल्या. या दरम्यान त्यांच्या गांधारीचे डोळे आणि मध्यरात्र या कादंबऱ्या आणि इतर बरेच ललित साहित्य प्रकाशित झाले. नागनाथ कोत्तापल्ले सरांनी कथा, कादंबरी, ललित लेख सोबतच समीक्षा लेखनही केले. साहित्याचा अन्वयार्थ, आधुनिक मराठी कविता, नवकथाकार शंकर पाटील, ग्रामिण साहित्य : स्वरूप आणि बोध हे त्यांचे समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. निवडक बी रघुनाथ आणि स्त्री पुरुष तुलना या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी अनेक महत्वाच्या पदावर अध्यक्ष म्हणून काम केले. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच एस सी बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ अशा महत्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. यावशिवाय मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्यवाहकपदही त्यांनी सांभाळले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर काही नियतकालिकांचे संपादकही होते.

२०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. जवळपास पाच दशके आपल्या समर्थ लेखणीने मराठी भाषेला समृद्ध करून डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर आपल्यातून निघून गेले. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात मोठी पोकळी झाली आहे. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांना भावपूर्ण श्रद्धांजली!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

# बहीण-भावांनो, विनंती- जाणून जवळ करावे; लोभ असावा !

आधुनिक केसरी

**इ.स.१९९२पासून ३ डिसेंबर हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघातर्फे दिव्यांगांचा दिवस म्हणून घोषित झालेला आहे. दीव्यांग व्यक्ती कुणाला ओझे न ठरता ती स्वावलंबी व स्वयंपूर्ण व्हावी. तिच्या मनात न्यूनगंड निर्माण होऊ नये. यासाठी जागतिक स्तरावरील आरोग्य संघटना प्रयत्नशील व कार्यप्रवन रहावी म्हणून तीला हा प्रेरणादायी दिवस ठरवून देण्यात आला आहे. या दिवसाची सर्वांना माहिती होऊन त्यांनी दिव्यांगांची परवड थांबवली पाहिजे. यास्तव हा श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींचा मार्गदर्शक लेख वाचकांच्या सेवेत. दिव्यांगत्व अर्थात अपंगत्व हे संयुक्त राष्ट्रांच्या सहस्त्रकीय प्रगती योजनांतील एक महत्त्वपूर्ण उद्दिष्ट असून इ.स.२०१५ सालापर्यंत या समस्येवर सुवर्णमध्य गाठण्याचा प्रयत्न चालू आहे.**

त्यासाठी इ.स.१९९२पासून ३ डिसेंबर हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघातर्फे अपंगांचा दिवस म्हणून घोषित झालेला आहे. शारीरिक किंवा मानसिक त्रुटीद्वारे विकलांग बनलेल्या समाजातील घटकांच्या समस्या समजावून घेता याव्यात म्हणून या दिवसाची योजना आहे. दिव्यांगांचे प्रश्न जाणून घेऊन त्यांच्या उद्धारासाठी हातभार लागावा तसेच समाजातील अन्य लोकांना प्रेरणा मिळावी म्हणून हा दिवस पाळला जातो. विविध उपक्रमांद्वारे निधी उभारला जावा म्हणून या दिवसाची योजना आहे. संयुक्त राष्ट्रसंघातर्फे सन १९८३ ते १९९२ हे दशक दिव्यांगासाठी अर्पण करण्यात आले होते व त्याद्वारे जगभरच्या सरकारांना त्यांच्या उद्धारासाठी मोहिमा राबविण्यास भाग पाडले होते. दशकअखेरीस ३ डिसेंबरची निवड झाली आणि सन १९९२मध्ये पहिला दिव्यांग दिन साजरा झाला होता. मित्रांनो, ३ डिसेंबर हा जागतिक अपंग दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने काही प्रेरणादायी अपंग व्यक्तींची माहिती करून घेऊ. या सर्व व्यक्तिचित्रांमध्ये एक धागा समान आहे. या व्यक्तींनी शारीरिक व्याधींवर मात करून स्वतःचे सामर्थ्य सिद्ध करून दाखवले आहे. वॉल्ट डिस्ने, ग्रॅहम बेल, एडिसन, आइनस्टाइन आदिंचे जीवनकार्य बघता त्यांना व्याधी होती, यावर आपला विश्वासच बसणार नाही. पण ध्येय समोर असेल, ते साध्य करण्याची जिद्द असेल आणि आपण जे काही करत आहोत त्यावर निष्ठा असेल, तर कुठलेही काम असाध्य नाही. यापैकीच काहींची थोडक्यात माहिती- १) लुईस ब्रेलः वयाच्या तिसऱ्या वर्षी झालेल्या अपघातामुळे आलेल्या अंधत्वाने खचून न जाता यांनी बोटांच्या स्पर्शाने वाचली जाणारी ब्रेल लिपी तयार करून अंधांसाठी ज्ञानाचा प्रकाश पसरवला. या बहुमोल लिपीचा उपयोग आज जगभरातील अंध व्यक्तींना होत आहे. २) सुधा चंद्रनः एका दुर्दैवी अपघातात आपला एक पाय गमावल्यावर जयपूर फूटच्या साहाय्याने ती पुन्हा उभी राहिली. आणि नुसतीच उभी न राहता तिने शास्त्रीय नृत्य आणि अभिनयाच्या जोरावर जागतिक कीर्ती संपादन केली. ३) हेलन केलरः सन १८८० साली जन्मलेल्या हेलन केलर यांच्यावर मेंदूज्वरामुळे बालपणीच मूक-बधिरत्व आणि अंधत्व ही दोन्ही संकटे एकत्रितरीत्या कोसळली. यापकी कोणतेही एक अपंगत्वसुद्धा सामान्यांचे जीवन उद्ध्वस्त करायला पुरेसे असते. परंतु या असामान्य स्त्रीने शिक्षिकेच्या मार्गदर्शनाखाली आपले उच्चशिक्षण



आंतरराष्ट्रीय दिव्यांग सप्ताह

डोंगराएवढ्या अडचणींना तोंड देत पूर्ण केले. हेलन अमेरिकन विद्यापीठातील प्राध्यापिका, लेखिका आणि समाजसेविका म्हणून विश्वविख्यात झाल्या. ४) ऑस्कर पिस्टोरियसः पोटऱ्यांच्या खाली पाय नसलेला हा दक्षिण अफ्रिकेचा ब्लेड रनर-धावपटू. हा धावपटू अपंगांच्या ऑलिम्पिकमधील विश्वविक्रमासहित १००, २०० व ४०० मीटर दौडमधील सुवर्णपदक विजेता आहेच, शिवाय सन २०१२ साली झालेल्या लंडन ऑलिम्पिक सारख्या जागतिक स्पर्धेत ४०० मीटर स्पर्धेसाठी पात्र ठरून आपण अव्यंग लोकांपेक्षा कमी नाही, हेही सिद्ध केले. ५) स्टीफन हॉकिंगः या महान शास्त्रज्ञाला स्नायूंचा असा असाध्य आजार झाला की ज्यामुळे त्यांना कुठलीही हालचाल करणे जवळजवळ अशक्य झाले. तरीही त्यांनी तीक्ष्ण बुद्धिमत्तेच्या जोरावर भौतिकशास्त्रातील सृष्टीची निर्मिती आणि कृष्णविवर यावरील संशोधनाने नावलौकिक मिळवला. ६) मन्सूर अली खानः टायगर पतौडी यांनी कार अपघातात आपला उजवा डोळा गमावल्यावरही जिद्दीने भारतीय क्रिकेट संघात स्थान मिळवले. एवढेच नव्हे तर कप्तानपदाची धुराही सांभाळली. केवळ एकाच डोळ्याने दिसत असूनही उत्तम क्षेत्ररक्षक आणि "भरवशाचा फलंदाज" असा लौकिकही मिळवला. ७) बी.एस. चंद्रशेखरः भारतीय क्रिकेटला परदेशात विजयाची चटक लावणारी चंद्रशेखर- बेदी- प्रसन्ना- वेंकटराघवन् ही फिरकी गोलंदाजांची चौकडी सर्वपरिचित आहेच. यातील चंद्रशेखर हा सर्वात भेदक लेग स्पिनर होता. त्यांचा उजवा हात पोलिओग्रस्त होता. आपल्या व्यंगावर मात करून त्याचाच उपयोग त्यांनी फिरकी गोलदांजीसाठी करत भारतीय क्रिकेटच्या इतिहासात मानाचे स्थान मिळवले. आज जगातली दहा टक्के लोकसंख्या म्हणजेच सुमारे ६५ कोटी लोक या ना त्या रूपाने विकलांग आहेत. जागतिक आरोग्य संघटनादेखील अशा बांधवाच्या जीवनाची गुणवत्ता वाढावी म्हणून प्रयत्नशील आहे. त्यासाठी विभागीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध उपक्रम हाती घेतले जातात. हा दिवस साजरा करताना महत्त्वाच्या पायऱ्या लक्षात घ्यायला हव्यात- शाळा, कॉलेजस्, सरकारी, खाजगी व निमसरकारी संस्थांतर्फे आयोजित उपक्रमात सहभागी होणे, विविध प्रचार मोहिमा आयोजित करून अपंगांच्या प्रश्नांना वाचा फोडणे व त्यांना सहकार्याचे अभिवचन देणे, विकलांग बांधवांच्या ठायी असलेल्या छुप्या कलागुणांचा साक्षात्कार होण्यासाठी उत्सव, शिबीरे किंवा मेळावे भरविणे आणि त्यांची जगण्याची उभारी वाढविणे, दिव्यांगांच्या उद्धारासाठी जागतिक स्तरांवरची नियमावली कटाक्षाने पाळली जात नसेल तर त्यासाठी काटेकोरपणे दक्षता घेऊन ते मार्गी लावणे. दिव्यांग म्हणजेच ज्याचे अंग दिव्य सोसत आहे अर्थात शरीर अधू झालेले आहे. त्यालाच विकलांग किंवा अपंग असेही म्हटले जाते. लोक त्यांना संबंधित अवयवहीन म्हणून चिडवतात. जसे की आंधळा, पांगळा, लंगडा, हेकणा, चकणा, बहिरा, मुका, थुटा, बुटका, नकटा, चपटा, आदी शब्द योजून त्यास अपमानास्पद वागणूक दिली जाते. यातील काही शारीरिक व्यंग हे जन्मजात असतात. तर काही अपघाताने झालेले असतात. ते काहीही असले तरी दिव्यांग व्यक्तींनाही स्वाभिमानाने व सन्मानाने जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. ते कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. म्हणून शासनासह लोकांनीही त्याचे शिक्षण, भरणपोषण, चलनवलन, मनोरंजन, आवागमन, आवडनिवड, छंद, आदींची पूर्तता केली पाहिजे. त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होऊन जीवन संपवू शकतील अशाप्रकारचे व्यंगावर जोर देऊन किंवा चिडवून बोलणे सामान्य लोकांनी टाळलेच पाहिजे. या आंतरराष्ट्रीय दिनाच्या माध्यमातून त्यांना जीवन जगण्यास बळ आणि नवी उमेद मिळावी, हाच शुद्ध सात्विक हेतू यामागील आहे.




सौ. मनीषा कांदळकर
मु. पो. ता. येवला, जि. नाशिक

# कौमार्य

आधुनिक केसरी

**समाजात आजही मुलींना कौमार्य परीक्षेत उत्तीर्ण व्हावं लागतं, पवित्रतेचा पुरावा पहिला रात्री मिळाला नाही तर तिचा मानसिक कोंडमारा, अपमान सहन करावा लागतो. आजही अशा घटना समोर येत नसल्या तरी कथेतील नायिका राधा अनेक ठिकाणी आहे. काही जणी परिस्थितीला तोंड देत यशस्वी होतात तर काही जणींचे आयुष्य उद्ध्वस्त होते. त्यातून घटस्पोट, कौटुंबिक वाद या गोष्टी घडतात. अशीच नायिका कथेतून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. कथेतील पात्र पुढीलप्रमाणे आहेत. नायिका-राधा, मुलगी-प्रीती, पती-मनोज, नणंद- स्वाती, इतर पात्र-आई वडील, सासू- सासरे.**

आज राधाचं मन कशातच लागत नव्हतं. प्रीतीचा फोन आला का ते दहा वेळेस तपासून झाले. तेवढ्यात मोबाईलची रिंग वाजली. आई निकाल लागला, "मी कलेक्टर झाली" हे शब्द ऐकल्याबरोबर राधाच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. तिला बोलताही येत नव्हतं, तिने स्वःताला सावरून कशीबशी बोलली, "अभिनंदन बेटा कष्टाचं चीज केलं." आणि फोन बंद केला. ती कॉटवर बसली उरात जो हुंदका दाबून ठेवला ते दुःख आक्रोशाने बाहेर पडले आणि ती ओक्साबोक्सी रडू लागली. तिचा स्वाभिमान, 'स्वत्व' कुठेतरी हरवून कोणतीही चूक नसतांना



अपराध्यासारखी वागत होती. अवहेलना, अपमानाची धग सोसत होती. संसार सुखाचा करण्यासाठी पंचवीस वर्षापासून आनंदाच उसणं अवसान आणून ती जगत होती. आजही पंचवीस वर्षापूर्वी उंबरठा ओलांडून आलेली ती नववधू स्वच्छ आरशाप्रमाणे आठवत होती.
मनोजचं स्थळ सुशिक्षित व संस्कारी घर म्हणून बाबांनी लग्न ठरवले तेव्हा मी बारावीची परीक्षा दिली होती. मी दिसायला सुंदर चारचौघीत उठून दिसणारी त्यामुळे कॉलेजला ऍडमिशन घेतानाच आईने समज दिली होती. परपुरुषाशी बोलायचं नाही, कॉलेजचे घर कुठे भटकायचे सलवार पायजमा व अंगभर ओढणी असा पेहराव घालत मान वर न करता अब्रू इज्जत या शब्दांनी इतकं जखडून ठेवलं की मुक्तपणे वावरले नाही. वडील शेतकरी त्यात आम्ही तिघी बहिणी होतो. दोन बहिणींची लग्न झाली होती. भाऊ शिक्षण घेत होता. शेतकरी बापाला मुलींचं लग्न म्हणजे तारेवरची कसरत त्यांची आर्थिक ओढाताण बघून असं वाटायचं मुलगी म्हणून शेतकऱ्याच्या घरात जन्मास येऊ नये. मी बाबांना समजवण्याचा प्रयत्न केला, "मला शिक्षण पूर्ण करू द्या मी नोकरीला लागल्यानंतर लग्न करते" पण तरुण मुलगी म्हणजे बापाच्या जीवाला घोर त्यांचा मुलींवर विश्वास होता पण जगावर नाही. त्यात शिक्षणासाठी तालुक्याच्या गावी जायचं त्यामुळे त्यांनी माझं ऐकलं नाही. लग्न ठरल्यानंतर मी रडत बसले तेव्हा आईने डोक्यावरून मायेनं हात फिरवत म्हणाली,"तू शिकावं मोठी व्हावं असं आम्हाला वाटत नाही का? पण अब्रू म्हणजे काचेचं भांड तडा गेला तर जोडत नाय माझी बाय असं म्हणून प्रेमानं माझ्या तोंडावरून हात फिरवला.
सप्तपदी चालतांना सात जन्माच्या बंधनात अडकले. पती परमेश्वर हे संस्कार रुजवल्याने तेव्हाच तन मन अर्पण केले. नवरी सुंदर आहे म्हणून खूप कौतुक झाले, सासु सासऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद होता. गृहप्रवेश करताना सुंदर संसाराचे स्वप्न घेऊन माप ओलांडून घरात आले. दोन भाऊजी, जावा, नणंदा, भाचे यांनी घर भरलेले होते दोन दिवसांनी सत्यनारायण पूजा करून परत मुळास माहेरी निघाले तेव्हा मनोजने डोळ्याने इशारा करून रूममध्ये बोलवले मी सर्वांच्या नजर चुकून रूममध्ये जाताच त्याने दरवाजा लावला. मी भिंतीला टेकले त्याने मला बाहूच्या पिंजऱ्यात अडकवून माझ्या ओठांवर ओठ ठेवले मी लाजेने लालबुंद झाले व बाहेर पळाले त्यांच्या नजरेत स्पर्श सुखाची मधु मिलनाची आस दिसली.

दोन दिवस आईच्या सहवासात तिने संस्कारांची उजळणी केली. आता सासरचं तुझं घर आहे, "प्रेमानं माणसं आपलेसे कर." आता मला कळून चुकलं ह्या घराला मी कायमची पारखी झाले. सासरी आल्यानंतर आज स्वयंपाक घरात माझा पहिलाच दिवस असल्याने सासूबाईंनी मला भाजी करण्यास सांगितले. गृहप्रवेशानंतर माझी परीक्षा सुरू झाली होती. रात्री जेवण करतांना माझ्या स्वयंपाकाची तारीफ झाली. मी मनोमन सुखावले, चला..! पहिला पेपर पास झाले... रात्री बेडरूममध्ये नणंदा व मित्रपरिवार यांचा चेष्टा मस्करी हसण्याचा आवाज येत होता. स्वातीताई मला बेडरूममध्ये घेऊन आल्या,"वहिनी बेस्ट ऑफ लक" म्हणत हसत बाहेर गेल्या. आयुष्यातील मधुचंद्राची रात्र दोन अनोळखी जीवांचं मिलन एकमेकात एकरूप होऊन संसारिक जीवनास प्रारंभ होणे. मनोजने प्रेमाने मला बघितले व त्याच्या मिठीत मी सामावून गेले. सकाळी उशिराच जाग आली ते दरवाज्याच्या आवाजाने मी घाई घाई उठले तोवर मनोज खाली गेले. मी बेडशीट व्यवस्थित केले, सासूबाई आत आल्या माझं लक्ष सासूबाईंकडे गेले तर त्या बेडशीटवर काहीतरी न्याहळतांना दिसल्या तसे त्यांच्या चेहऱ्यावरचे हावभाव बदलले जळजळीत कटाक्ष माझ्याकडे टाकला तसा माझा थरकाप झाला, माझं काय चुकलं मला समजेना. मी नजर चुकवत खाली गेले.

हॉलमध्ये सर्वजण जमा झाले. सासुबाई तावातावाने बोलत होत्या,"उष्ट्या पत्रावळीवर मनोज जेवला वाटतं." कुठे तोंड काळे केले असेल देव जाणे. पूर्वी आपल्या जातपंचायतीत नववधू पवित्र नसली तर लगेच सोडचिठ्ठी देत असत. तेवढ्यात स्वातीताई म्हणाल्या, "सुशिक्षित म्हणवतेस आणि असा विचार करतेस,"असं काही नसतं. जावांची नजर बदलली त्यांच्या नजरेत मी अपमानित झाले. खरंच, स्त्री पवित्र अपवित्र असते का? निसर्गाने सृजनशीलतेचा हक्क भावना दिलेल्या असतांना तिला पावित्र्य व पवित्र्यावर तोलायचं का? मी विचार करू लागले, कोमार्य परीक्षेत मी नापास झाले. आता मानहानी अपमान तिरस्कार आयुष्यभर सोसावं लागेल का? तेही माझी काही चूक नसतांना! या विचारांनी मी कोलमडली. मनोज काय प्रतिक्रिया देतात यावर माझा आत्म स्वाभिमान घरातील स्थान अवलंबून होते.

मनोज हॉलमध्ये आले. घरातील वातावरणावरून त्यांना अंदाज आला काहीतरी बिघडले, काय झालं? तसं सासुबाई बोलल्या, "तुझी नाजूक सुंदर बायको कोरी नाही, "हे तुझ्या लक्षात आलं नाही का? ते गडबडले काही न बोलता घराबाहेर गेले. आतल्या मला आईच्या बोलण्यातील काळजी अब्रू म्हणजे काचेचे भाडं काय ते समजायला लागलं, मी रूममध्ये जाऊन दरवाजा बंद केला आणि विचार करू लागले खरंच! स्त्री शिकून मोठी क्षेत्र पादाक्रांत करून उच्च पदावर आहे ती मुल, घर सांभाळते तरी तिला आदर सन्मान मिळतो येतो का? ती मनमोकळेपणाने हसली, परपुरुषाशी बोलली तरी तिच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवले जातात. एक वस्तू नवी कोरी असली की तिला किंमत आणि ती वापरून झाल्यानंतर किंमत नाही. माझं मात्र मी नवं खेळणं असून सुद्धा काही कारणास्तव कोरे पण सिद्ध करू शकले नाही म्हणून मला वस्तूसारखं भिरकावलं जाईल का? स्त्रीचा मान, सन्मान, आदर तिच्या पवित्र्यावर ठरतो का? असे प्रश्न माझ्या बालिश बुद्धीला पडले कशाचाच ताळमेळ लागेना मी सैरभैर झाली.

मनोजनं मला स्वीकारले परंतु कोरेपण सिद्ध करू न शकल्यामुळे त्यांच्या नजरेत प्रेम सन्मान कधीच दिसला नाही. संधी मिळेल तेव्हा सासुबाई टोचून बोलायच्या कोण्या पुरुषाशी बोलले तर संशयाने बघायच्या चार भिंतीत स्वत्व नसलेली मी स्वतःला सिद्ध करण्याचा प्रयत्न करायची, पण मी पवित्र आहे. हे आयुष्यभर दाखवण्याचा प्रयत्न केला तरी मी पास होणार नव्हते, मला मुलगी झाली, आई झाल्याने मातृत्व मिळाले पण त्याच दिवशी मी ठरवले माझ्या मुलीला समाजात इतकं उच्च स्थानावर बसवेन की तिला कधीच अपमानित व्हावं लागणार नाही. आणि आई म्हणून तरी माझा सन्मान मिळवेन. माझे स्वप्न तिच्यात रुजवत होते, तिला घडवत होते. आणि आज अभिमानाने माझी मान उंच झाली होती.

# अनुवादातून मराठी साहित्य प्रकाशमान करणारा : 'सूर्य'नारायण

आधुनिक केसरी

**प्रगतीशील लेखक संघाच्या वतीने अकरावे कॉ. अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलन औरंगाबाद येथे दि. ३ व ४ डिसेंबर रोजी संपन्न होत आहे. या संमेलनाचे अध्यक्ष जागतिक कीर्तीचे अनुवादक डॉ. सूर्यनारायण रणसुभे आहेत. त्यांच्या एकूण वाटचालीचा धावता आढावा आम्ही येथे प्रकाशित करत आहोत.**

डॉ. सूर्यनारायण रणसुभे यांचा जन्म ०७ ऑगस्ट १९४२ रोजी हैद्राबाद संस्थानातील गुलबर्गा जिल्ह्यात झाला. घरी अत्यंत बिकट परिस्थिती. कारण खाणारी अकरा तोंड आणि कमावणारी चार हातं. त्यामुळे त्यांना रोजच्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. तो काळही तसाच होता. परंतु अशाही परिस्थितीत रणसुभे शिकत राहिले. आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर एक एक पाऊल पुढे टाकत राहिले. अंत्यत प्रतिकूल परिस्थितीत ते जीवन जगत होते. मात्र दुसरीकडे शैक्षणिक प्रगतीत ते आघाडीवर होते. ज्या वयात इतर मुलांसोबत खेळणे, बागडणे हे त्यांच्या वाट्याला आलेच नाही. कारण रोजच्या जीवनसंघर्षात त्यांना आईवडिलांना हातभार लावावा लागला. यासाठी ते छोटे मोठे काम करत असत.

वयाच्या पंधराव्या वर्षांपर्यंत त्यांना नवीन पुस्तके घेता आले नाहीत. कपडे शिवून लेवता आले नाहीत, परंतु ते कोणत्याही गोष्टीचा खेद व्यक्त न करता ते जगत राहिले. जीवनाबद्दल आशावादी राहिले. रोज येणाऱ्या संकटांना तुडवताना माणूस आशावादी होतो. मजबूत होतो. कारण संकटे नेस्तानाबूत झाली की, जगण्याला उभारी येते. रोजचा संघर्ष तुडवून रणसुभे सर पुढे वाटचाल करत होते. कारण आजचा दिवस उद्या निश्चित बदलेल, ही त्यांच्या संपूर्ण कुटुंबाची भूमिका होती. दरम्यानच्या काळात त्यांनी अवांतर वाचनही सुरू केले. यात त्या काळात असणारे उपलब्ध साहित्य ते वाचत होते. यात अनेक कादंबऱ्या त्यांनी वाचल्या. बालवयात त्यांचे शिक्षक शंभूनाथ यांच्यामुळे त्यांना साने गुरूजींच्या विचाराचे महत्त्व समजले. घरात छोट्याशा खोलीत अभ्यास होणार नाही म्हणून रणसुभे सर इतर मुलांच्या रूमवर जाऊन रात्रीला अभ्यास करत. कारण आजूबाजूच्या खेड्यातील मुलं तिथं रूम भाड्याने घेऊन शिक्षण घेत असत. गुणवत्ता एक अशी गोष्ट आहे की, ती सर्वांना आकर्षित करते, जवळ करते. हाच अनुभव रणसुभे सरांना आला. ते वर्गात पहिल्या पाचात असणारे होते. त्यामुळे त्यांचा सहवास कुणाला नको होता? रात्रीला चार पाच तास अभ्यास करून सकाळी ते घरी जात असत. शाळेव्यतिरिक्त मिळणाऱ्या वेळेत ते कामाला जात असत.

तत्कालीन मॅट्रीक परिक्षेसाठी रणसुभे सरांनी जीवापाड मेहनत केली. त्याचे फळही त्यांना मिळाले. राज्यात ते अकरावे आले. त्यामुळे सर्वांच्या भुवया उंचावल्या. रणसुभे सरांपेक्षा कमी मार्क्स घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे वडील त्यांच्या घरी येऊन सूर्यनारायण मेडीकलला ॲडमिशन कधी घेणार? असे विचारू लागले. परंतु घरातील परिस्थितीपुढे त्यांच्याकडे या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी होते. कारण साडे चार वर्षांचा लागणारा खर्च, ॲडमिशन फिस भरण्याइतकी आर्थिक सक्षमता त्यांच्याकडे नव्हती. गुणवत्तेलाही आर्थिक आधार हवाच असतो, हे कटू वास्तव नाकारता येत नाही. अडचणीत आपला स्वार्थ साधणे ही मानवी प्रवृत्ती काही नवल नाही. यावर मात म्हणून आर्थिक संपन्न असलेल्या नातेवाईकांनी त्यांना लग्नाची मागणी घातली. शिक्षणाचा सर्व खर्च उचलण्याची हमी दिली. परंतु वाचनाचे समृद्ध झालेल्या रणसुभे सरांच्या मनोभूमिकेला ते पटले नाही. त्यांनी तो प्रस्ताव नाकारला. मग पुढे काय? हा प्रश्न होताच. मग त्यांनी बी. एस्सी. करण्याचे ठरवले. हे वर्ष होते सन १९६० चे.



दरम्यानच्या काळात केंद्र शासनाच्या वतीने हिंदी विषयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा शंभर रुपये शिष्यवृत्ती देण्याची योजना जाहीर झाली. यासाठी देशभरातून फक्त अकरा विद्यार्थी निवडले जाणार होते. याच शिष्यवृत्तीला लाभ मिळावा यासाठी त्यांचे शिक्षक प्रयत्न करू लागले. कारण रणसुभे सरांची परिस्थिती सर्वांना माहीत झाली होती. इतका गुणवत्ताधारक विद्यार्थी शिकला पाहिजे, त्याची आर्थिक नाकाबंदी तुटली पाहिजे, यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. पण फॉर्मवर फोटो लावण्यासाठी सुद्धा त्यांच्याकडे पैसे नव्हते. परंतु माणूस हा समाजशील प्राणी असल्याने दुसऱ्याच्या नाशात आनंद मानणाऱ्यापेक्षा दुसऱ्याच्या सुखात आपला वाटा देणाऱ्या सत्प्रवृत्ती जिवंत आहेत. काळ कोणताही असला तरी चांगली माणसेच समाज निर्माण उभा करत आली आहेत. या फोटो प्रकरणातही त्यांच्या एका मित्राने आपली ओळख वापरून मार्ग काढला. आणि तिथून रणसुभे सरांच्या जीवनाचा मार्ग बदलला. त्या शिष्यवृत्तीच्या जोरावर रणसुभे सर एम. ए. पर्यंत शिकले. मग पुढील शिक्षणासाठी अलहाबाद येथे गेले. तिथे त्यांना हिंदीतील दिग्गज साहित्यिकांशी भेटता आले. बोलता आले. त्यांचे लिखाण समजून घेता आले. याच विद्यापीठात त्यांना राममनोहर लोहिया यांना ऐकता आले. तिथेच त्यांच्या समाजवादी विचारांचा आणि मार्क्सवादी विचारांचाही प्रभाव पडत गेला. मात्र घरच्या परिस्थितीने शिकविलेला जीवनव्यवहार त्यांना मार्क्सच्या विचारांकडे वेगाने घेऊन गेला. एम. ए. पूर्ण केल्यानंतर लातूरच्या दयानंद महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू झाले. मग घरातील गरिबीचा अंधार फाकत गेला आणि चंद्रभानु सोनवणे यांच्या सहवासात त्यांच्यात सुप्त अवस्थेत दडलेला लेखक उजागर होत गेला. मग त्यांनी लघुकथा, समीक्षणात्मक लेखनाला सुरुवात केली. तीन राज्यांच्या सीमा ओलांडून अध्ययन आणि अध्यापन करताना डॉ. रणसुभे सरांना जे जीवनानुभव मिळाले. त्या शिदोरीला लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ते अनुवादाकडे वळले. मग त्यांनी मराठी साहित्यातील अत्यंत लोकप्रिय आणि वेगळ्या वळणावरच्या पुस्तकांचा हिंदीत अनुवाद केला. यात मराठी साहित्याला त्यांनी देशपातळीवर नेले. अनुवाद म्हणजे नवनिर्मितीच असते. यासाठी स्वतंत्र चिंतन, निरीक्षणं, लोकभाषेचे ज्ञान असावे लागते. शब्दानुवादापेक्षा भावानुवाद फार महत्त्वाचा असतो. हेच सूत्र डॉ. रणसुभे यांच्या अनुवादातून अधोरेखित झाले आहे.एकूणच त्यांच्या वाङ्मयीन वाटचालीत त्यांच्यावर मुन्शी प्रेमचंदांचा मोठा प्रभाव राहिला आहे. यासोबतच वैचारिक भूमिकांच्या बाबतीत ते ठाम राहिले आहेत. 'नास्तिकता ही काही परकीय उचलेली बाब नाही. ती तर आपल्या देशात पूर्वापार चालत आलेली आहे.' यासाठी ते चार्वाकापासून ते आजच्या काळातील लोकांचे उदाहरणे देतात. मार्क्सच्या तत्त्वज्ञानाबद्दलही त्यांचे मत तेच आहे. कारण रोजच्या अवघड जगण्याला सहज, सोपं आणि इतरांबरोबर माना-सन्मानाचं जीवन देणारा कोणताही विचार आपलाच होतो, यावर त्यांचा विश्वास आहे. डॉ. रणसुभे सरांचे साहित्य देशभरातील विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले आहे. ते एक सृजनशील लेखक आहेत. संवेदनशील कलावंतांनी अन्याय, अत्याचार आणि सामाजिक विषमतेविरुद्ध आवाज उठवला पाहिजे, ही त्यांची आग्रही भूमिका आहे. हीच त्यांच्या जगण्याची वहिवाट आहे. सृजनशील लेखकांने ग्रहणशील व्हावं आणि जगाला कुरूप न दाखवता जग सुंदर, मंगलमय करावं, अशी स्वप्नं पाहत ज्या अण्णा भाऊ साठे यांनी आपली लेखणी झिजवली. आपल्या कलात्मक विचारातून मराठी साहित्य सातासमुद्रापार नेले. त्याच वाटेवरचा प्रवास डॉ. रणसुभे सरांनी केला आहे. कारण आजच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या अगोदर पुस्तक (ग्रंथ) हेच समाजाचे माध्यम होतं. त्याच माध्यमाचा आधार घेऊन मराठी साहित्याचे किरणं सर्वदूर प्रकाशमान करण्याचे काम डॉ. सूर्यनारायण रणसुभे सरांनी केले आहे. त्यांच्या एकूणच कार्याला मानाचा सलाम!

**-वैजनाथ वाघमारे**
**संचालक, शब्दवेध प्रकाशन, औरंगाबाद**
**मो. ८६३७७८५९६३**

# ध्येय निश्चित करा यश तुमचेच आहे!

आधुनिक केसरी

प्रत्येकाच्या जीवनात ध्येयाला खुप महत्व आहे. प्रत्येकात काहींना काही महान कार्य करण्याची क्षमता आहे. मात्र ही क्षमता आपल्याला ओळखता आली पाहिजे. एखाद्या व्यक्तीची वाट चुकली तर त्याचे भवितव्य अंधकारमय असते. त्यासाठी नेहमी आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रीत करण्याची खर्या अर्थाने गरज आहे. सतत ध्येयाने पछाडले पाहिजे. आयुष्यात ध्येय असणे खुप गरजेचे आहे. ध्येय निश्चित करुन आपल्याला यश मिळणारच हा दृष्टिकोन अंगी बाळगण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी मोठी स्वप्ने पाहिली पाहिजेत.

प्रत्येक बदलाची सुरुवात ही स्वताःपासुन झाली पाहिजे. बदल हा सृष्टीचा नियम आहे. आधी आपल्याला बदलता आले पाहिजे. आज माणुस दिशाहीन झाला आहे. गोंधळलेली त्याची अवस्था झाली आहे. काय करायचे आणि काय नाही हे त्याला कळेनासे झाले आहे. केवळ मार्गदर्शन नसल्याने तो आपले ध्येय हरवून बसला आहे. मी काही तरी करेन ही आशा त्याच्या मनात झाली पाहिजे. आपल्या आयुष्याचे ध्येय ठरवता आले पाहिजे. त्याकरीता आपल्यातील



उणिवा शोधून काढाव्या लागतील. त्याचबरोबर आपल्या आयुष्याची वाटचाल देखिल करायला हवी. आज प्रत्येकात काही ना काही करण्याची धमक आहे. त्यासाठी त्यांनी ध्येय ठरवून जिद्दीच्या व परीश्रमाच्या जोरावर यश मिळवले पाहिजे. आपले उचित ध्येय ठरवून यश मिळवले पाहिजे. प्रत्येकाने आपल्या मनात ध्येय निश्चित करुन सतत आशावादी राहीले पाहिजे. आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रीत करा एक ना एक दिवस तुम्ही इतिहास घडवल्या शिवाय राहणार नाही. प्रत्येकात काही ना काही उपजत गुण असतात. परिस्थिती कशीही असू देत त्यातून मार्ग काढता आला पाहिजे. त्यासाठी ध्येय ठरवता आले पाहिजे.अनंत आमुची ध्येयासक्ती, अनंत अन आशा किनारा तुला पामराला, कवि कुसुमाग्रजांच्या कोलंबसनचे गर्वगीत या कवितमध्ये त्यांनी सुंदर वर्णन केले आहे. आपुली ध्येय शक्ती आपल्याला यशाकडे घेऊन जात असते. त्यासाठी सतत प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. मला बदलायचे आहे. हे मनात ठरवा. मी यशस्वी होणारच हा आत्मविश्वास आपले ध्येय गाठण्यासाठी मदत करू शकतो. ध्येयपुर्तीसाठी संयम बाळगला पाहिजे. संयम ठेवून आपण आपले ध्येय निश्चित साकारू शकतो. मनात कोणताही न्यूनगंड बाळगता कामा नये. प्रामाणिकपणा अंगी असायला हवा. आपल्या बुद्धीची पात्रता समजून घेता आली पाहिजे. योग्य नियोजन करा आपल्या ध्येयावर ठाम रहा. आपली ध्येय शक्तीच आपल्याला नेहमी प्रेरणा देत असते. स्वामी विवेकानंद ध्येयाविषयी सांगतात ध्येयाविषयी उत्कृष्ट निष्ठा ही मेघातून पडलेल्या पाण्यावाचून दुसरे कोणतेही पाणी न पिणाऱ्या चातकाप्रमाणे असावी. प्रत्येकाने आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रीत करून कष्टाची तयारी ठेवली पाहिजे. माणसाला अनुभवातून शहाणपण येतं असते. आपली वाट न चुकता ध्येय ठरवता आले पाहिजे. आजच्या धकाधकीच्या जीवनात खडतर परीश्रमाशिवाय ध्येय मिळणे अशक्य आहे. प्रत्येक परीस्थीतीतून मार्ग काढता आला पाहिजे. मात्र त्यासाठी धडपड करण्याची गरज आहे. आपले ध्येय मोठे असले पाहिजे. कितीही कठीण प्रसंग येऊ देत आपण आपल्या ध्येयापासून विचलित होता कामा नये.

प्रत्येकाला वाटते आपण उच्च पदावर जावे यात काही शंका नाही.जायलाच हवे आणि जावे देखिल मात्र एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा आपल्याला ध्येय गाठायचे असेल तर मेहनती शिवाय पर्याय नाही.मन ताब्यात ठेवा चांगले विचार बाळगा क्षेत्र कोणतेही असु द्या.मेहनत प्रामाणिकपणा अंगि असल्यास ध्येय निश्चित केल्यास यश हमखास मिळेतेच. डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम म्हणत आपले ध्येय साध्य करण्याकरिता तुमच्या ध्येयावर लक्ष केंद्रीत करावे लागेल. तेव्हा आपले ध्येयावर लक्ष केंद्रीत करा व जिवनात उच्च ध्येय बाळगा यश तुमच्या सोबत असेल. आपले ध्येय किरकोळ ठेवू नका.ते नेहमीच उच्च ठेवा आपले ध्येय नेहमीच महान असले पाहिजे तेव्हा ध्येय निश्चित करा यश तुमचेच आहे!

संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. 7721045845

# श्री क्षेत्र गाणगापूर

आधुनिक केसरी

या संगमाभोवतीच अष्टतीर्थांचा अधिवास आहे. या संगमात स्नान केल्याने भाविकाचे अनेक पापे धुतली जाऊन दिव्य अनुभव येतोच हे मात्र निश्चित. निर्गुणमठाच्या पादुकादर्शन अगोदर भाविक संगमावर स्नान करतात. पौर्णिमेचे संगम स्नान विशेष मानले जाते. गाणगापूर परिसरात अष्टतीर्थांचा नित्य वास आहे. ही अष्टतीर्थे पुढीलप्रमाणे होत –१) षट्कुल तीर्थ, २) नृसिंह तीर्थ, ३) भागीरथी तीर्थ, ४) पापविनाशी तीर्थ, ५) कोटी तीर्थ, ६) रुद्रपाद तीर्थ, ७) चक्रेश्वर तीर्थ व ८) मन्मथ तीर्थ. भागीरथी तीर्थालाच 'काशीकुंड' असे म्हणतात. एका ब्राह्मण भक्ताने या ठिकाणी श्री शंकराची आराधना करुन त्यांना प्रसन्न करुन घेतले. त्या भक्ताच्या इच्छेने श्रीमहादेवांनी काशीची गंगा तिथे आणली. श्रीपापविनाशी तीर्थावर श्रीमत्परहंस वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामींना श्रींचे साक्षात दर्शन घडले होते. याच तीर्थांवर श्री नृसिंहसरस्वतींनी आपल्या भगिनीला-रत्नाबाईला स्नान करावयास सांगितले होते. त्यामुळे तिची कुष्ठादी पापे नाहीशी झाली. श्री क्षेत्र गाणगापूर येथील अष्टतीर्थे श्रीमन नृसिहसरस्वती स्वामी महाराजांनी भक्त जनासाठी दिवाळीचे प्रथम दिनी प्रकट केली. तो पुण्य पावन दिवस होता नरक चातुर्दशीचा! याबाबत सविस्तर माहिति "श्री गुरु चरित्र" ह्य पवित्र ग्रंथात ४९ व्या अध्यायात आली आहे. येथील अष्टतीर्थे स्नानाचे फळ – गाणगापुर

"षट्कुळ व नृसिंह तिर्थ" (१-२) ह्या तीर्थात् स्नान केल्याने (भक्ती पूर्वक) काल मृत्यु व अप मृत्यु नाहीसा होवून शतायुष्य प्राप्त होते. ह्या तीर्थात् स्नान केल्याने प्रयाग येथील त्रीवेणि संगम् नद्यांचा स्नानचा फळ मिळते. भागिरथी (३) तीर्थात् स्नान केल्याने समस्त दारिद्र्य नाश होवून् काशी क्षेत्रातील गंगा स्नानाचा पुण्य मिळते. "पाप विनाशी" (४)



'तीर्थात् स्नान मात्रें पाप राशी जैसे तृण अग्नि लागे', म्हणून इथे स्नान केल्याने समस्त पूर्व जन्मांचे पाप जळून राख होतो. ह्याच तीर्थात् स्नान केल्यांने स्वयं महराजांचे भगिनि "रत्नाई" चे श्वेत कुष्ठ नाहिसा झाला. कोटि तीर्थ (५) ह्या तीर्थात स्नान केल्याने आत्म शुद्धी होवून् मोक्ष प्राप्त होतो व जंबू द्वीपा मध्ये असलेले सर्व पवित्र तीर्थांचे महिमा ह्या तीर्थात् आहे. येथे स्नान केल्याने अनंत पुण्य मिळते व येथे यथा शक्ति दान केल्याने कोटि दान केलेले पुण्य मिळते. रुद्र पाद (६) हे तीर्थ "गया" समान आहे. गया क्षेत्रातिल सर्व आचरण येथे करून् रुद्र पादाला पूजल्यास् कोटि जन्मांचे दोष नाहीसा होवून् मोक्ष प्राप्ति होते. चक्र तीर्थ (७) हा तीर्थ द्वारावति तीर्थ समान आहे. येथे स्नान करून् येथील केशव मंदिरात् पूजल्यास द्वारावतिचे चौपट् पुण्य मिळते व अज्ञानिला ज्ञान प्राप्ति होते.

"मन्मथ तीर्थ" (८) येथे स्नान करून कल्लेश्वराला पूजल्यास वंश वृद्धि होवून अष्टैश्वर्य प्राप्त होते. भस्माचा डोंगर – गाणगापुर भस्माचा डोंगर या दिव्य स्थळाचा एक विशेष महत्व आहे. सदरील भूमीमध्ये अनेक ऋशी मुनींनी केलेली तप साधना यामुळे या तपोभूमितील "विभूती" अनेक भाविक घरी घेऊन जातात, त्याच प्रमाणे आपली मनोकामना पूर्ण होण्यासठी येथील पाषाणा द्वारे रचना तयार करायची एक पद्धत येथे प्रचलीत आहे.श्रीक्षेत्र गाणागापूरचे भस्म प्रसिद्ध आहे. हे भस्म हाच तिथला मुख्य गुरुप्रसाद असतो. हजारो वर्षांपासून ही भूमी पवित्र असल्यामुळे त्या काळात या ठिकाणी भगवान परशुरामांनी मोठमोठाले यज्ञ जगाच्या कल्याणासाठी केले होते. त्याच यज्ञातील विभूती साचून तिथे भस्माची एक प्रचंड टेकडीच निर्माण झालेली आहे. आजपर्यंत लक्षावधी श्रीदत्तभक्तांनी या भस्म टेकडीतून पवित्र भस्म नेउनही ही भस्माची टेकडी आहे तशीच आहे. श्रीक्षेत्र गाणगापूरच्या भस्माने पिशाच्च बाधा हटते. दृष्टिबाधा नाहीशी होते. रोगराई नाहीशी होती. हे भस्म संकटनाशक, दुरितहारक आहे. परमार्थिक साधकाच्या कल्याणासाठी या भस्माचा उपयोग करतात. संन्यासीवृंद भस्मस्नानासाठी याच भस्माचा उपयोग करतात. निर्गुण पादुका -दिव्य निर्गुण पादुका म्हणजे साक्षात दत्त महाराजांचा अधिवास आहे. अवतार समाप्तीच्या वेळी नरसिंह सरस्वतींनी भक्तांसाठी दिलेला हा परम पवित्र प्रसाद आहे. भीमा नदी मधून अवतार समाप्तीचा प्रवास करताना अचानक गुप्त जाहल्या नंतर सर्व भक्तांना या पादुका स्थळी "श्री नृसिंहसरस्वती" महाराजांनी दर्शन दिले. गाणगापूर तेथील पादुकांना 'निर्गुण पादुका' अशी संज्ञा आहे. येथील पादुकांना केवळ अष्टगंध आणि केशर यांचे लेपन करतात कुठलाही पाणी स्पर्श नाही. या पादुका चल आहेत. त्या त्यांच्या आकाराच्या संपुटांत ठेवलेल्या असतात. संपुटांतून मात्र त्या बाहेर काढल्या जात नाहींत. संपुटांना झाकणे आहेत. **क्रमशः**

# परात्मतेचा परमोत्कर्ष

आधुनिक केसरी

**वयाच्या पंचवीसाव्या वर्षी कोसला लिहून नेमाडेंनी आर्थिक सर्वहरा वर्गाची अर्थात शेतकरी मध्यम जातींची परात्मता मांडायला सुरुवात केली. पुढे त्यांनी झुल, हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ, बिढार, जरिला या आपल्या साहित्याविष्कारातून ही परात्मता अफलातून रेखाटली आहे. या नेमाडेंच्या समग्र साहित्याची नस पकडली ती कॉ शरद पाटलांनी *परात्मतेचा परमोत्कर्ष* या एकाच विधानात. याबद्दल कॉ.राजकुमार घोगरे म्हणतात " परात्मभाव शेतकरी वर्गातील मध्यम जातींच्या कोषातील घुसमटीचा अविष्कार आहे. नेमाडेंच्या अभिजात कादंबऱ्यातून तो ज्या पध्दतीने चितारला गेला तो थोरच आहे. क्रांत्योत्सूक कॉ. शरद पाटील, जात्यंतक तत्वज्ञ, ते न टिपतील तर नवलच झाले असते.**

आपण तर कॉ. शरद पाटलांच्या जात्यंतक तत्वज्ञानाचे वारसदार. आपण आपल्या प्रबोधनाची मुख्य धारा या शेतकरी समुहातील मध्यम जातींच्या परात्मतेला बनवली, हा प्रयास आर्थिक सर्वहारांच्या सामाजिक सर्वहारा जातीसमुहाशी 'ग्रँड युनियन' बनन्याकडे आपल्याला घेउन जाईल. हे ग्रँड युनियन बनवण्याचे महान कार्य भारताच्या अपूर्ण क्रांतीचा न टाळता येणारा टप्पा आहे.

शरद पाटील यांच्या मांडणीला पुढे नेताना कॉ घोगरे शेतकरी मध्यम जातींच्या या परात्मभावाला जाणून घ्यायला शिकवतात. वर्णजातीव्यवस्थेत परार्थीकरण तर भांडवलशाहीत परात्मीकरण. आणि ह्या परात्मीकरणाचा सर्वात मोठा बळी पडलेला वर्ग म्हणजे शेतकरी मध्यम जाती होत. त्यांच्या भावभावनांचे तंतोतंत चित्रण नेमाडे या व्यक्तिने प्रथमच न संकोचता, तथा हाथ आखडता न घेता, मुक्तपणे ही मांडणी केलेली आहे. परात्मतेबद्दल राम बापट यांनी संपादित केलेल्या ग्रंथात 'परात्मभाव' या प्रकरणात संजय पळशीकर भांडवलशाहीत झालेले बदल मांडताना म्हणतात १) माणूस निसर्गापासून दुरावला आहे. २) माणूस स्वताला पारखा झाला आहे. ३) माणूस त्याचे वैशिष्ट्य गमावून बसला आहे.४)माणूस इतर माणसांपासून तुटला आहे. " बापट म्हणतात त्याप्रमाणे परात्मभावाची हिच प्राथमिक लक्षणे आहेत. कोसलाच्या समिक्षेत कॉ शरद पाटील म्हणतात *कोसला म्हणजे सुरवंटाचा कोष.पांडुरंग सांगवीकरला वर्गीय- जातीय समाज कोषातच मारतो. त्याच्या मध्यम जातीयतेमुळे तो जातीविद्रोहाचे फुलपाखरू बनून बाहेर पडु शकत नाही. देवाचे अन्न सर्वत्र पसरलेले आहे. पण तो प्रेत बनल्याने त्याला ते खाता येत नाही.

भालचंद्र नेमाडे , रा.ची. ढेरे, कॉ शरद पाटील सोडता बाकी मध्यम जातवर्गीय साहित्यीकांचे साहित्य सुद्धा परात्मभाव निर्माण करते. एकांगीपणा आनते. त्याला ते गोंडस शब्दात निकोप जीवनशैली वगैरे म्हणतात. असल्या निकोप जीवनशैलीवाल्या साहित्तीकांचे साहित्य वाचून विद्रोही बंड तर होऊ शकत नाही उलट वाचक स्वार्थी, स्वकेंद्री बनतात. म्हणून राजकुमार घोगरे म्हणतात की शेवटी शरद पाटील म्हणायचे नेमाडेंना जपा. त्यांना डिवचू नका. त्यांची साहित्याची पुढची मांडणी त्यांना करु द्या. नेमाडे,ढेरे शपा एकाच काळात एकमेकांना न भेटलेले तिन महारथी आहेत.

कोसला या शब्दाचे यथोचित वर्णन करुन शरद पाटील नेमाडेंच्या मांडणीचा केंद्रबिंदू पकडतात. परात्मता म्हणजे तुटलेपणा, व्यवस्थेपासुन स्वताचे झालेले अलगीकरण. ही परात्मता अलीकडल्या काळात शेतकरी जातींमध्ये परमोत्कर्षाला पोहंचली आहे. मावळतीच्या सरंजामशाहीतून शेतकरी जातींच्या नव्या पिढ्या जेव्हा महाकाय भांडवलशाहीत प्रवेश करतात आणि ते नव्या जगाला जुळवून घेता घेताच हा परात्मतेचा संसर्ग त्यांना होतो. गावगाडा आणि त्यातील चिवचिवाट संपत जावून भांडवली शिक्षण व्यवस्थेतून शिकुन आलेल्या नव्या पिढ्या गावोगाव ओट्यावर बसुन एकलकोंडेपणाचा, तुटलेपणाचा रोग गावाला लावत आहेत. मग नेमाडे वेगळं काय मांडतात ? हेच तर पारंपरिक साहित्यप्रकाराला धक्के देत काहिच वेगळे न मांडता, आहे तेच मांडणे हे नेमाडेंचे वेगळेपण आहे. कोसलातला पांडुरंग सांगवीकर परात्मता आल्यावर शेवटी लग्नाच्या बोहल्यावर उभे रहायला तयार तरी होतो. तो गावी जावून रहातो तरी. पण आज मात्र शेतकरी जातीतील तरुणांना विचारा काय करतोस सध्या ? तरुणांची उत्तरे MPCS , UPCS ची तयारी करतो किंवा स्पर्धा परिक्षेची तयारी करतो अशी उत्तरे असतात. ग्र्याज्युअशन करुन परात्मता आलेले बहुतांश तरुण पुणे , औरंगाबादला तयारीच्या नावे वयाची बत्तीशी ओलांडे पर्यंत एकात्म एकलकोंडे जीवन जगत असतात. गावी जावे तर ग्रामीण जीवन, ती संस्कृती आपल्याला स्विकारत नाही. त्यात आपण संस्कार झाल्यामूळे फीट होत नाही. हे परात्म जीवन त्याला नको झाले आहे. म्हणून शहरातच रहाणे पसंत करुन तो कुटुंब, लग्न याला पिडा मानायला लागतो. हे पीडन काळीज तोडून टाकणारे आहे. त्याची एक स्वतंत्र व्यथा आहे. शोषितांच्या-पिडीतांच्या शोषणपीडनाच्या पातळीवर ती सामाजिक सर्वहाराची १ ते१० मध्ये १० असेल तर आर्थिक सर्वहाराची ती ५ तरी असेल का नाही. सामाजिक चळवळींना ही व्यथा समजून घ्यावी लागेल. दुसरी परात्मता आलीय ती मध्यमवर्गीय टामटुम शहरी वर्गात. त्यांनी व्यवस्थेची झुल पांघरली आहे. नेमाडेंच्या झुल मधे आहेच की हे. झुल म्हणजे तरी काय ? बैलाच्या पाठीवर झुल टाकून त्याला कधीतरी नवाजायचे,



कौतुक करायचे आणि मग वर्षभर तो आहे तसे चालु ठेवनार. कोसायचे नाही, कुथायचे नाही, आहे ते गोड मानुन बैलासारखे राबायचे. हे विद्रोह मारण्याचे काम शिक्षणव्यवस्थेतूनच होत आले आहे. याबद्दल नेमाडे झुलमधे ऐके ठिकाणी म्हणतात *हि शिक्षणपद्धती म्हणजे देशातल्या तरण्याबांड पोरांना हिजडे बैल बनवनारी धुर्त युक्ती आहे आणि अगदीच खरे आहे हे. म्हणून प्राध्यापक हे झुल पांघरलेले, आंडे ठेचलेले बैलच आहेत. त्यांच्या आंगावर टाकलेली सत्काराची शाल, पारितोषिके ही झुलच आहे. नक्षीदार झुल. आदिवासी, दलीत जातीमध्ये गावोगाव ही परात्मता आलेली नाही. या जातवर्गातील ज्यांचे शहरीकरण, ब्राम्हणीकरण झालेले आहे, ते मात्र परात्मच जीवन, तुटलेले जीवन जगतात.

मी नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील गिरणा धरणाच्या परिसरात व्याख्यानाला गेलो होतो. तिथे मुक्कामी थांबलो होतो.सकाळी उठल्यावर आयोजकांच्या आंगणात बसलो असता,समोरून एक अहिराणी भाषा बोलत एक व्यक्ती आली. हतात रिकामी पाण्याची बाटली होती.बोलण्याच्या हावभावरुन कळले की त्यांना पेट्रोल हवे आहे. गाडी बंद पडली आहे. मी ज्यांच्याकडे थांबलो ते राजेंद्र पगार यांनी आपल्या गाडितील पेट्रोल काढून त्यांना दिले.ते व्यक्ती निघून गेले.त्यांनी मदत म्हणून मोबदला न घेता स्वताच्या गाडीतले पेट्रोल काढून समोरच्याला दिले,त्यांना स्वताच्या गाडित पेट्रोल टाकायचे झाल्यास तालुक्याला जावे लागते. या न-तूटलेल्या, अ-परात्मभावात मदतीची, सहकार्याची भावना आणि उत्साह असतो. आता मी हा प्रोग्राम करुन आल्यावर दुसऱ्याच दिवसी आमच्या नातेवाईकांना भेटायला गेलो.तिथे मधल्या खोलीत स्कुटी झाकून टाकली होती. कारण स्कुटीवाल्या ताईंची डिलीव्हरी झाली होती. घरात इतर दोन-तीन जन स्कुटी वापरु शकत असूनही कौटुंबिक तूटलेपणातून, या परात्मभावातून ती स्कुटी झाकून टाकून प्याक करुन टाकली होती. भांडवलीकरणाच्या आघाताने निर्माण नव्या जात-वर्ग झालेल्या समाजात परात्मभाव येतो आणि तिथे प्रत्येक गोष्टीत नफ्यातोट्याचा व्यवहार असतो. त्यामूळे, इतरांना मदत, सहानुभूती, सहकार्य या तर दुरच्या गोस्टी. आदिवासी भागात मदतीसाठी सहज पुढाकार घेतला जातो. येथे मात्र शहरीकरण झालेल्यामध्ये कुटुंबात सुद्धा मदतीची भावना राहिली नाही. हे भयावह वास्तव आहे. एकाच कुटुंबात शिकलेले शहरी भाऊ -भाऊजई आणि शेती करणारे गावाकडे रहानारे शेतकरी जोडपे. ही अ-परात्म व परात्मभावाची उदाहरणे आहेत. जीवजाईपर्यंत राबनार्या गावाकडच्या जावू बाईं आणि त्यांचा शेतकरी नवरा शहरात गेल्यानंतर शहरी भाऊ आणि शहरी जावूबाई ह्या ग्रामीण भागातून आलेल्या त्या जोडप्याला कशा वागवतात, तर अगदीच चहा पोहे एवढ्यावर भागवून सर्व मोजमापात असते. या उलट त्याच शहरी जाउबाई आणि त्यांचे शिकलेले मिस्टर गावाकडे गेल्यावर त्यांना गावकडील भाऊ भाऊजाई किती आनंदाने रोजच्यापेक्षा वेगळे स्पेशल जेवन करुन घालतात. ग्रामीण जोडपे उत्साही असते. शहरी जाऊबाई गावाकडे आल्यानंतर स्वयंपाकात मदतही करत नाहीत. शहरी जाऊबाई गावाकडे गेल्यानंतर त्या फक्त मिरवतात कुटूंबातील कामे , चुलीची कामे त्यांना नसतात. ही एकाच कुटूंबातील शहरी ग्रामीण परात्मता - अपरात्मतेची उदाहरणे आहेत. ही आर्थिक सर्वहारा जाती अंतर्गत परात्मता कोण मांडनार की नाही? त्याशिवाय जात्यंताची कोंडी फुटू शकत नाही. कोसलाच्या समिक्षेत शरद पाटील म्हणतात "मध्यमजातीयांपाशी विद्रोहाच्या अंगाराएवजी राहिली आहे परात्मतेची राख ! निमभांडवली विकासात कुटुंबबंध विघटीत झाले असून मध्यम जातींचे प्रस्थापित हे जातीवादाचा उपयोग केवळ स्वगोतावळ्याच्या स्वार्थासाठी करीत आहेत. अशा अनंत व असहाय पोकळीत पांडुरंग सांगवीकर व चांगदेव पाटलांसारखे मध्यम जातीय उभे असल्याने त्यांच्या परात्मतेचा परमोत्कर्ष झालेला आहे. पुढे शरद पाटील म्हणतात,"मध्यम जातीयांच्या या षंढ परात्मतेचा अभूतपूर्व व अनन्य साहित्यिक आविष्कार नेमाडेंनी केला आहे. त्यांचा प्रतिनायक वर्गजाती व्यवस्थांतक पॉझिटिव्ह हिरोमध्ये परकायाप्रवेश करण्यासाठी भटकतो आहे भूत बनून."

हा शपांना अपेक्षीत असलेला वर्गजातीव्यस्थांतक पॉझिटिव्ह हिरो आम्ही घडवनार सौत्रांतिक मार्क्सवाद घेवून मानव मुक्ती मिशनच्या माध्यमातून.

आणि तुम्ही नेमके नेमाडेलाच वगळायला निघालात. मग या मराठी साहित्यविश्वात सामाजिक व आर्थिक सर्वहाराच्या ग्रँड युनियन बनविण्यासाठी नेमके काय उरेल तिथे ? तुमच्या नकारात्मक शेरेबाजीच्या परात्मतेची राख, किती जनांना पुसणार ही नकारात्मकतेची राख ? लक्षात घ्या. कोणतीही एक जात जातीअंत करुन जातीव्यवस्थेतून सुटका करुन घेऊ शकत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा CASTES अनेकवचनात मांडण्याचा प्रयत्न आपण नकारात्मकतेने दूर्लक्षिला नाही पाहिजे.

या! जरा मैदानावर, शेतकरी मध्यम जातीयांना फुलपाखरू बनायला मदत करु. नवनिर्मीतीत आनंद आहे.

**नितीन सावंत**
परभणी
संपर्क : 9970744142

# वने आणि आपण



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**पृथ्वी, वने, जल, वायू, प्राणी-पक्षी ही सगळी आपली साधन संपत्ती आहे. या संपत्तीच्या जीवावर माणूस जगला आहे. त्याच्या आधारावरच त्याने स्वतः चा विकास साधला आहे.पण आता तोच माणूस त्यांच्या जीवावर उठला आहे, अशी परिस्थिती आहे. निसर्गाला तो ओरबाडत आहे.त्याचा नाश करत आहे. त्यामुळे निसर्गाचे संतुलन बिघडत चालले आहे. त्यालाच ते धोकादायक ठरणार आहे.म्हणजे स्वतः च्या पायावर धोंडा मारून घेत आहे.मानवाने आगामी संकटे ओळखून राहिले पाहिजे.**

माणूस हासुद्धा निसर्गाच्या विराट चक्रातील एक घटक आहे, तो या चक्रातील विविध घटकांकडून सतत काहीतरी घेत असतो. वने हाही त्यातलाच एक घटक आहे. त्यामुळेच वनांचं रक्षण आणि संवर्धन करणं अत्यावश्यक आहे, हे सर्वांच्याच मनावर बिंबवण्याचं काम करायला हवं आहे. आज जगभरच जंगलांसंदर्भात दोन गोष्टी बोलल्या जातात. एक, जंगलतोड आणि दोन, जंगलांची कमी होत असलेली गुणवत्ता. जंगलातील वनसंपदा, तेथील अन्य सजीवसृष्टी, तेथील जमीन या साऱ्यांचा विचार करून जंगलाची गुणवत्ता ठरवली जाते. आपल्या देशातील जंगलांची गुणवत्ता या निकषांवर तपासून पाह्यला हवी. दुसरं असं की, वृक्षतोड आणि जाणीवपूर्वक आग लावून जंगल नष्ट करणं यातून जंगलांचा झपाट्यानं ऱ्हास होतो. जंगलांचा असा विचार करण्याचं कारण म्हणजे जंगलांना मानवी संस्कृतीच्या संदर्भात फार मोठं महत्त्व आहे. माणूस कितीतरी गोष्टी जंगलांतूनच घेत असतो. माणूस नावाच्या 'प्राण्या'ला 'मानवी' अस्मिता मिळण्याच्या अगोदरही तो जंगलांवरच अवलंबून होता आणि आजही तो तसाच अवलंबून आहे. माणसाला सहजसाध्य असणाऱ्या पिण्यायोग्य पाण्यातील तीनचतुर्थांश पाणी हे आपल्याला जंगलांतूनच मिळतं. तिथल्या पाणी साठण्याच्या नैसगिर्क जागा याबाबत मोठी कामगिरी बजावतात. जंगलांमुळे पावसाचं पाणी जमिनीत मुरायला मदत होते. जमिनीची धूप थांबते. कडे कोसळण्याचे प्रकारसुद्धा जंगलंच रोखून धरतात. आपल्याकडं 'देवराई' असण्याची पद्धत आहे. देवराई असलेल्या भागातील हिरवळ वर्षभर टिकून असते आणि तिथल्या पाण्यालाही कधीही खळ पडत नाही. कोकण परिसरातील देवराई, तिथलं घनदाट जंगल, पायाच्या घोट्यापर्यंत येणारा तिथल्या भूभागावरील झाडपाला, तिथल्या लता आणि वेली आणि भर दुपारी बारा वाजताही सूर्याची किरणं जमिनीपर्यंत आणू न देणारी तिथली हिरवीगर्द झाडी पाहिली की देवराई ही त्या परिसरातील मानवीवस्तीसाठी किती मोलाची कामगिरी बजावत असते, याचा साक्षात्कार होतो.

गेल्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये प्रदूषणाची, वातावरणात वाढत असलेल्या कार्बन डायऑक्साईड वायूच्या प्रमाणाची आणि त्यामुळं तापत जाणाऱ्या हवेची चर्चा सुरू झाली. या पृथ्वीवरील बहुरंगी जीवनातील चकित करणारी विविधता कमी होत असल्याची चर्चाही गेल्या शतकाच्या उत्तरार्धातच केली जाऊ लागली. ही विविधता कायम राखण्यात आणि हवामानातील बदलांचे प्रमाण कमी करण्यात जंगलंच मोठी भूमिका बजावत असतात. म्हणजेच शुद्ध हवा आणि पाणी, जैविक बहुविधता आणि परिसंस्थेचं 'आरोग्य' या गोष्टींसाठी जंगलं अत्यावश्यक असतातच; शिवाय जंगलांतच अनेक औषधी वनस्पती असतात. आजारी पडल्यावर चिम्पांझी काय खातात, याचं निरीक्षण करून माणसानं अनेक औषधी वनस्पती शोधून काढल्या. आयुवेर्दानं तर याबाबत मोलाचं काम केलं आहे. माणसाला आजारपणातून बरा करण्यासाठी लागणारी औषधं देणाऱ्या जंगलांबाबत कृतज्ञताच असायला हवी. आधुनिक विज्ञान तर जंगलांपासून स्फूर्ती घेऊन कितीतरी विविध प्रयोग करत आहे. वनस्पतीची पानं प्रकाश संश्लेषणानं स्वतःचं अन्न तयार करतात. तेच तत्त्व वापरून सौरऊर्जा तयार करण्यासाठी लागणारा 'सोलर सेल' तयार करण्यात अलीकडंच यश आलं आहे. या तंत्रामुळं प्रचलित पद्धतीत वापरल्या जाणाऱ्या सिलिकॉनपासून आणि म्हणूनच त्यापासून तयार होणाऱ्या त्रासदायक कचऱ्यापासून सुटका होणार आहे. आता तयार करण्यात आलेली 'कृत्रिम पानं' इमारतींच्या खिडक्यांमध्येही बसवता येतील आणि त्यापासून सौरऊर्जा मिळवता येईल, असा दावा केला जात आहे. हायड्रोजन वायूचा उपयोग करून आपल्याला पर्यायी ऊर्जा मिळवता येईल आणि एक दिवस ती रॉकेल, डिझेल, कोळसा यांची जागा घेईल, असा विश्वास व्यक्त केला जातो. त्याबाबतही संशोधन सुरू आहे. वनस्पतींची पानं उत्प्रेरकांच्या मदतीने ऑक्सिजनपासून हायड्रोजन वेगळा करतात, यापासून प्रेरणा घेऊन संशोधकांनी आता तीच रासायनिक अभिक्रिया कृत्रिम पानाद्वारे करण्याचे प्रयत्न चालवले आहेत. आपल्यासह नांदणाऱ्या वनसृष्टीकडून माणूस असं नवीन काही शिकत आहे. हे सारं लक्षात घेतलं तर माणूस हा वनस्पतींवर आणि म्हणूनच जंगलांवर किती अवलंबून आहे, ते कळतं. त्यांचं रक्षण करणं सार्वत्रिक हिताचं आहे, याचाही साक्षात्कार होतो. त्यातूनच 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' या तुकाराम महाराजांच्या सांगण्याला एकविसाव्या शतकात नवं परिणाम लाभलं आहे, हे जाणवतं. आताच्या काळातला अर्थ प्रत्येकाच्याच मनात खोलवर रुजायला हवा; कारण त्यातूनच माणसाला नव्या युगाला समर्थपणे सामोरे जाण्याचे बळ मिळेल.



# हुडहुड भरणाऱ्या गुलाबी थंडीत येणार निवडणुकीची गर्मी

## कन्नड तालुक्यात दुसऱ्यांदा होणार थेट जनतेतून 51 सरपंचांची निवड; हवसे - नवसे लागले कामाला

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** कन्नड तालुक्यात निवडनुकिचा बिगुल वाजताच भावी उमेदवार लागले कामाला 51 ग्रामपंचायतींचे सरपंच थेट जनतेतून तालुक्यातील ग्रामपंचायतींचे सरपंच हे थेट जनतेतून निवडले जाणार आहेत .तालुक्यातील मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे . तालुक्यातील 51 ग्राम पंचायतींवर जनतेतून थेट सरपंचांची निवड केली जाणार आहे . १८ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे . त्यामुळे गुलाबी थंडीत तालुक्यातील राजकीय वातावरण तापणार आहे . सरपंच उमेदवारांसह सदस्य पदांसाठी उमेदवारांची निवड पूर्ण प्रचार मोहिम साठी ग्रामपंचायतीमध्ये प्रशासक राज येणार व त्यामुळे ग्रामपंचायत निवडणूक लांबणीवर पडणार , अशा चर्चामुळे अनेक गावात उमेदवारांची निवड करण्यास पुढाऱ्यांनी दुर्लक्ष केले ग्रामपंचायत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर भावी उमेदवारांनी सर्वप्रथम मतदार याद्या गोळा करून आपल्या वॉर्डात किती मतदार आहेत , यापैकी किती जणांचे मतदान आपल्याला मिळू शकते , याचा अंदाज घेत सरपंच की सदस्य पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करायचा , याची तयारी करण्यास सुरुवात केल्याचे चित्र आहे . तालुक्याच्या क्षेत्रातील मतदारांच्या याद्या घेण्यासाठी ठिकाणी तहसील कार्यालयात ग्रामपंचायत भावी उमेदवारांची गर्दी दिसून येत आहे . होते . मात्र , आता सर्वांनी उमेदवारांच्या निवडीवर फोकस केला आहे . उमेंदवारीसाठी गुडघ्याला बाशिंग बांधून सज्ज असलेले निवडणूक लढण्यास इच्छुक उमेदवार लोकांच्या व पुढाऱ्यांच्या भेटी घेत आहेत . त्यातच पुढाऱ्यांनी सदस्यपदांसाठी उमेदवारांची यादी बनविणे सुरू केले असून , येत्या चार - पाच दिवसांत त्याला अंतिम रूप देऊन प्रचार सुरू करण्यात येणार असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे,

**कन्नड तालुक्यात निवडणुका होत असलेल्या ५१ ग्रा . पं . खालील प्रमाणे नावे-**
पळशी खु . शिरोडी, चिंचखेडा खु., दिगाव खे.टाकळी बु., तांदूळवाडी, नाचनवेल, आडगाव जे., जवखेडा बु .. माळेगाव ठो, भारंबा, औराळी, वडगाव ज. लोहगाव , विटखेडा, भिलदरी पि., बहिरगाव, डोणगाव, रिठ्ठी, दहिगाव, वासडी, कोळंबी मा. मेहेगाव, गव्हाली, खातखेडा, आडगाव पि., खामगाव, शिवराई, जवखेडा खु., सिरसगाव, सारोळा, ब्राम्हणी, गराडा, हरसवाडी, टाकळी लव्हाळी, हस्ता, देवपुळ, शेलगाव , जामडीज, हिवरखेडा गौताळा, मोहरा, गौरपिप्री, जामडी घा, आमदाबाद, भारंबा तांडा ... भोकनगाव, हिवरखेडा नांदगीरवाडी, वडनेर, कुंजखेडा, दाभाडी, जळगाव घाट या ग्रामपंचायतचा समावेश आहे . तुमचा हक्काचा मानुस उभा राहतो बरं . मंग भाऊ काय चालय ?, नमस्कार साहेब या चहा घेऊ ना लक्ष असू द्या, आपन दोघ भाऊ-भाऊ, अशा आदर पूर्वक मान सन्मान सरपंच व सदस्य इच्छुकांकडून सुरू झाला आहे . अनेक लोकांना निवडणुकीच्या योगाने का होईना मानसन्मान मिळत असल्याने त्यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण पहावयास मिळत आहे. अनेक लोक गावातील चौकाचौकात चावडीवर बसून ,चाय पर चर्चा करीत असल्याचे दिसत आहे, व प्रेतेक पैनल च्या उमेदवारांचे भविष्य ठरवत आहेत . थेट जनतेतून निवडणूक असल्यामुळे उमेदवाराला गावातील लोकांचा जेवणाचा खर्च करावा लागत आहे . त्यामुळे पैशाची मोठ्या प्रमाणात उधळपट्टी होत असल्याचे चित्र आहे . अनेकांनी आपापल्या मतदारांची यादी , मतदारांची नावे व मतदार यादी जुळवाजुळव करण्याची तयारी सुरु केली आहे.



**शिंदे गट आणि ठाकरे गट आमने -सामने-**
कन्नडचे आमदार उदयसिंग राजपूत हे शिवसेना उद्धव बाळासाहेब ढाकरे गटात तर दुसरीकडे कन्नडचे माजी आमदार तथा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष नितीन पाटील , नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष भरतसिंग राजपूत , तालुकाप्रमुख केतन काजे यांच्यासह अन्य पदाधिकारी शिंदे गटात आहेत त्यामुळे कन्नड तालुक्यातील ५१ ग्रामपंचायत मध्ये कोणता गट प्रबळ ठरेल हे चित्र बघण्यासारखे असेल . सध्या तरी कन्नड तालुक्यात शिंदे गटाचे वर्चस्व असल्याची चर्चा तालुक्यात होत आहे . कारण शिंदे गटाचे नवनिर्वाचित ग्रामीण विभागाचे जिल्हाध्यक्ष भरतसिंग राजपूत व तालुका प्रमुख केतन काजे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी गाठीभेटी घेण्यास सुरुवात केली आहे . जिल्हाध्यक्ष भरतसिंग यांची जुनि ओडख आहे भरतसिंग यांनी दुष्काळच्या काळात अनेकांना टैंकर द्वारे मोफत पिण्याचे पाणी वाटप केले होते त्यासोबत त्यांनी भरपूर विकास कामे ही केली होती,त्यांचाही तालुक्यात चाहता वर्ग मोठ्या प्रमानात आहे, भरतसिंग यांनी मागील काही वर्षा पासून राजकरण दूर केल्याचे चित्र होते मात्र त्यांचे जुने मित्र मंडळ शिंदे गटात शामिल झाल्याने त्यांनी ही राजकरण मध्ये उड़ी घेतली आहे, कन्नड शहरात विविध ठिकाणी भरतसिंग राजपूत चे बैनर दिसत आहे,त्यांच बरोबर तालुक्यात शिंदे व ठाकरे गटासह भाजप , राष्ट्रवादीचे वर्चस्व आहे त्यांच बरोबर माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी सुद्धा निवडनुकीच्या मैदानात, शेतकऱ्यांसोबत अनेकांच्या विविध कामे होत नसल्याने मोर्चे,आंदोलन, केले आहे,त्यांनी ही उतरण्याची कंबर कसली असल्याने या ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये चौरंगी-पंचरंगी लढती असणार आहेत . तसेच काही भागात अपक्षांचेही वर्चस्व असल्याने पंचरंगी लढती होणार आहे . तर मनसेचे उमेदवारही अनेक ग्रामपंचायतीमध्ये लढत देणार असल्याची माहिती मिळत आहे . यामुळे सर्वच राजकीय नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे .त्यांच बरोबत अनेक राजकिय खिलाड़ी रिंगणात उतरणार आहेत . लाखो रुपये खर्च करून काही ओल्या पार्टी देऊन लोकांना खुश करतीलही परंतु , उमेदवाराचे भविष्य मतदार राजाच्या हाती आहे . सरपंच हा शेवटी मतदानाच्या पेटीतूनच ठरणार आहे . ऑक्टोबर २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नव्याने स्थापित होण्यासाठी या सर्व ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी १८ नोव्हेंबर २०२२ रोजी संबंधित तहसीलदार निवडणुकीची नोटीस प्रसिद्ध करतील . या ग्राम निवडणूकीसाठी गावातील लोक काम धंद्यासाठी पुणे मुंबई , औरंगाबाद , नाशिक , सुरत अशा मोठ्या शहराच्या ठिकाणी गेले आहेत . तसेच गावातील ऊस कामगार मजूर सुद्धा ऊस तोडीला गेलेले आहेत . या लोकांना आणण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे . बाहेरगावाहून जे कोणी या लोकांना आणेल तो नक्कीच आघाडी घेईल, अशा प्रकारच्या चर्चा चावडीवर रंगू लागल्या आहेत . या वेळेची निवडणूक थेट जनतेतून होत असल्यामुळे अनेक रथी , महारथी २८ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२२ या कालावधी मध्ये नामनिर्देशन पत्र अर्ज दाखल करण्यात येतील . दाखल अर्जांची छाननी ५ डिसेंबर रोजी होणार आहे . ७ डिसेंबर रोजी दुपारी तीन वाजे पर्यंत दाखल अर्ज मागे घेता येणार आहे . याच रोजी दुपारी तीन वाजे नंतर निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी व त्यांना चिन्ह वाटप करण्यात येणार आहे . या निवडणूकीसाठी मतदान १८ डिसेंबर २०२२ रोजी होणार असून मतमोजणी २० डिसेंबर २०२२ रोजी होणार असल्याची माहिती मिळत आहे.

### दुसऱ्यांदा जनतेतून सरपंच निवड केली जाणार ...!

तालुक्यात होणाऱ्या 51 ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये चुरस वाढली आहे . निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेल्या तारखेपासून निवडणुक क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे . त्यामुळे राजकीय पक्षांच्या सभा , बैठका , भूमिपूजन आणि लोकार्पण कार्यक्रमांना ब्रेक लागला आहे . दरम्यान , ग्रामपंचायत निवडणुका जाहीर झाल्याने विविध कार्यक्रम , उत्सवांच्या माध्यमातून भावी उमेदवार जनसंपर्क वाढवीत असल्याचे चित्र ग्रामीण भागांत दिसून येत आहे . त्याच बरोबर निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत निवडणुकीच्या तारखा जाहीर करताच ग्रामीण भागात बैठकांनी जोर पकडला आहे . कन्नड तालुक्यातील ५१ ग्राम पंचायतच्या ४२९ सदस्य व थेट जनतेतुन सरपंच पदासाठी आपला भाऊ सरपंचपदासाठी उभा राहतो बरं , लक्ष असू द्या ! अश्या प्रकारच्या बोलीचा गावपातळीवर मतदारांचा आदर वाढला ; कन्नड तालुक्यात ५१ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीचे बिगुल वाजले आहे, तालुक्यात ढाकरे गट आणि शिंदे गट आमनेसामने निवडणूक होणार असून निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याने संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रात आचार संहिता लागू झाली आहे, या वेळेस सरपंचपदाची निवडणूक थेट जनतेमधून होत आहे . त्यामुळे प्रचार करताना उमेदवारांची चांगलीच दमछाक होणार आहे . तालुक्यात ५१ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीचा रणसंग्राम रंगणार आहे . सध्या गावागावात जो तो निवडणुकीच्या गोष्टी करू लागला आहे . ज्या व्यक्तीला कधी कोणी बोलायचे नाही , त्या व्यक्तीला उमेदवार मोठ्या आदराने विचारपूस करत आहेत . अनेकांच्या घरी जाऊन उमेदवार प्रचार करत आहेत की , "भाऊ तुमचा आशीर्वाद असुदया मि सरपंच पदासाठी उभा राहत आहे अश्या भावनिक बोली आइकायला मिळत आहे,तालुक्यात ढाकरे व शिंदे गट त्यात सोबत माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांचा गट निवडनुकीच्या मैदानात असल्याची चर्चा होत आहे, मात्र तिन्ही गट जैय्यत तयारीत आहे बाजी मारनार कोन हे तर निवडनुक झाल्यानंतरच कळणार ..!



# जामीन झाल्याचा वाजवला डंका...! संदीप पाटलांनी केला आरोपीचा भणका

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** अंबिका नगर येथे राहणाऱ्या एका इसमाचा विरुद्ध खून प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असता सदर व्यक्तीने औरंगाबाद हायकोर्टातून जामीन मंजूर केल्याने फिर्यादी व साक्षीदार यांच्या मनात दहशत निर्माण करण्यासाठी जमाबंदी आदेश असताना मोटर सायकल रॅली काढण्यात आली त्या अनुषंगाने आरोपीवर पुन्हा कारवाई करण्यात आली व मोटरसायकली जप्त करण्यात आल्यात. चाळीसगाव रोड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आरोपी गुन्हया मध्ये सत्तार मासुम पिनारी, अंबिका नगर येथील खुणाच्या आरोपात असताना कित्येक दिवसापासून फरार झालेला होता आरोपीत यनि फरार कालावधी मध्ये मा . उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला होता . सदर अर्जाच्या अनुषंगाने मा . उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी नमुद आरोपीत यांस दिनांक २९ डिसेंबर रोजी अंतरिम जामीन मंजूर केलेला होता . सदर अंतरिम जामीन मंजूर झाल्याने आरोपी सत्तार मासूम पिंजारी यांची अंबिका नगर परिसरात राहणा - या इसमाने फिर्यादी व साक्षीदार यांचे मनात दहशत करून दबाव निर्माण व्हावा या उद्देशाने अंबिका नगर से अंजान शहा दाता सरकार पर्यंत मोटारसायकली रैली काढलेली होती . सदर मोटरसायकल रॅली काढणा - या इसमांनी मा . जिल्हाधिकारी , धुळे यांचा जिल्हयात जमावबंदी आदेश लागु असतांना देखील विनापरवाना मोटरसायकल रॅली काढलेली होती . नमुद इसमांनी अंतरिम जामीन मंजूर झालेला आरोपीत नामे सत्तार मासुम पिंजारी याची मिरवणुक काढणे हे प्रचलीत कायदयास लागू होत नाही त्याअनुषंगाने चाळीसगाव रोड पोलीस स्टेशन येथे पोको देवेंद्र तावडे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून चाळीसगाव रोड पोलीस स्टेशन ३४ ९ / २०२२ भा.दं. वि. कलम १४ ९ , १४३ , १४ ९ , ९ ८८ यह क्रिमीनल लॉ अमेनमेंट कायदा कलम २७ सह मुंबई पोलीस कायदा १ ९ ५१ चे कलम ३७ ( १ ) ( ३ ) चे उल्लंघन १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे . नमुद गुन्हयामध्ये मोटरसायकल रैली काढणारे व रैलीमध्ये सहभागी होणारे इसम नामे १ ) सत्तार मासुम पिंजारी ऊर्फ सत्तार मेंटल रा . अंबिका नगर , पत्रेवाली मशिदजवळ धुळे,समीर मन्यार सईद मन्यार, आमीर रियाज शेख ऊर्फ आमीर माया,गुलाच रसुल शब्बीर अहमद अन्सारी, शेख सोहल शेख सलीम वर्क सिधी, शोएब खान गुलाब खान, महम्मद फारुख खान ऊर्फ भिल्ल, महम्मद शाहीद महम्मद रियाज अहमद ,अख्तर नईम कुरेशी, सर्व रा. अबिका नगर , धुळे अशांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आलेली आहे . नमुद आरोपीत यांचेकडुन गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हयात वापरलेल्या १,३५,००० / - रु.फि ४ मोटरसायकली व मिरवणुक काढण्यासाठी वाजविण्यात येणारे ३,००० / - रु . कि . ढोल जप्त करण्यात आलेले आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपास पोऊनि व्ही. टी. पवार हे करीत आहेत . सदरची कारवाई पोलीस अधिक्षक संजय चारकुंड सो. अप्पर पोलीस अधिक्षक किशोरकुमार काळे सो . मा. उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदिप मैराळे, साक्री विभाग, अतिरीक्त कार्यभार धुळे शहर विभाग, धुळे यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली सपोनि संदिप पाटील, पोउपनि / विनोद टी पवार, पोहवा / पंकज चव्हाण, पोहवा / संदीप पाटील, पोना / भुरा पाटील, पोना / विशाल मोहने, पोकॉ / इंद्रजीत वैराट, पोकॉ / स्वप्निल सोनवणे पोकों / देवेन्द्र तायडे , पोकों / चेतन झोळेकर , पोकों / सोमनाथ चीरे अशांनी केली आहे .

# चाकाखाली सापडून तरुणाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**एरंडोल :** तालुक्यातील तळई येथे आयोजित बारा गाड्या ओढण्याच्या कार्यक्रमात चाकाखाली सापडून गंभीर जखमी झालेल्या तरूणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.राहुल पंडित पाटील ( ३०, तळई ) असे या मृत युवकाचे नाव आहे. एरंडोल तालुक्यातील तळई येथे चंपाषष्ठीनिमित्त सायंकाळी उशिरा बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम झाला. यावेळी ग्रामस्थांची मोठी गर्दी झाली होती. या ठिकाणी राहुल पाटील मित्रासोबत उभा होता. बारा गाड्या ओढताना राहुलला गर्दीत धक्का लागून तो खाली पडला. बारा गाड्यांच्या चाकाखाली सापडून गंभीर जखमी झाला. ग्रामस्थांनी त्याला तातडीने जळगाव येथील खासगी रुग्णालयात दाखल केले होते. उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. राहुल पाटील हा जिल्हा बँकेच्या एरंडोल तालुक्यातील निपाणे येथील शाखेत लिपिक म्हणून नोकरीला होता. दोन वर्षांपूर्वीच त्याचा विवाह झाला होता. या प्रकरणी जळगाव शहर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# आपेगाव विविध कार्यकारी सहकारी सोसायटीत ज्ञानराज शेतकरी विकास पॅनलचा विजय

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** मार्केट कमेटीचे माजी सभापती आन्नासाहेब औटे, खरेदी विक्री संघाचे प्रल्हाद औटे, त्यांच्या नेतृत्वाखाली आपेगाव येथील सोसायटी च्या निवडणूकीत ज्ञानराज शेतकरी विकास पॅनलचा मोठ्या फरकाने विजय झाला. विठु माऊली शेतकरी विकास पॅनलचे व मंत्री संदिपान भुमरे यांचे खंदे समर्थक पांडुरंग औटे यांच्या पॅनलचा दनदनित पराभव झाला तर ज्ञानराज माऊली पॅनललचा मोठ्या फरकाच्या मतानी विजयी झाले. यावेळी आपेगाव येथे विजयी मिरवणूक काढण्यात आली विजयी मिरवणुकीत अँड. कांतराव औटे,बळीराम औटे, राजेंद्र औटे, प्रा. युवराज औटे, अशोक औटे, ज्ञानेश औटे, आन्नासाहेब मालीपाटील, संजय थोरात, ज्ञानेश्वर थोरात, रामचंद्र औटे, गणेश औटे, सारंगधर गडकर, लहु औटे, भाऊसाहेब कांतराव औटे, सतिष औटे, ज्ञानदेव औटे, प्रमोद औटे, सुभाषराव औटे,आन्नासाहेब ठेणगे, एकनाथ कोल्हे यांची उपस्थिती होती. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या श्रीमती येसगे यांनी काम पाहिले.

**निवडून आलेले संचालक पुढीलप्रमाणे**
**सर्वसाधारण कर्जदार गट -**
औटे अंकुशराव एकनाथ, औटे बद्रीनाथ आसाराम औटे सुनील श्रीमंत, ठेणगे भगवान धोंडीराम, थोरात केशव जनार्दन, थोरात संभाजी दशरथ, पठाण महेमुद हसनखॉ, महिला राखीव मतदारसंघातून औटे सावित्रीबाई मधुकर, घेर राहिबाई आन्नासाहेब, अनुसूचित जाती - जमाती राखीव मतदारसंघातून दादासाहेब घोडके, भटक्या जाती- जमाती व विशेष मागास प्रवर्ग राखीव मतदारसंघातून मिसाळ सुखदेव आसाराम यांची निवड झाली आहे.



# निष्कृष्ट दर्जाचे होत असलेले काम चिमुकल्यांनी आणले उघडकीस

आधुनिक केसरी न्यूज

**जामोद :** येथे 15 वित्त आयोगातून येथील आठवडी बाजाराचे तार कंपाउंड चे व माती मुरूमाचे ओट्यांचे ग्रामपंचायत प्रशासनाकडून सुरू असलेले अतिशय निष्कृष्ट दर्जाचे काम आठवडी बाजार परिसरातील चिमुकल्यांनी उघडकीस आणले आहे काही दिवसांपूर्वीच आठवडी बाजाराचे जेसीबीच्या साह्याने माती उकरून माती मुरूमाचे ओटे तैयार करण्यात आले सदर या बाजाराच्या तार कंपाऊंडच्या कामासाठी मातीच्या ओठ्यांशेजारीच संबंधीत ठेकेदाराने कडक जागेवर खोल खड्डे न खोदताच केवळ अर्धा ते एक फुट अँगल गाळून अल्प प्रमाणात सिमेंटचा व मातीचा वापर करून हे अँगल तार कंपाउंड साठी काही दिवसांपुर्वी



उभे केले होते परंतु आठवडी बाजार परिसरात खेळणाऱ्या चिमुकल्यांचा या अँगल ला धक्का लागताच निष्कृष्ट दर्जात उभे करण्यात आलेले अँगल जमिनीवर कोसळल्याने चिमुकल्यांनी एका पाठोपाठ वरच्या वर उभे असलेले अँगल पाडून जामोद ग्रामपंचायत कडून करण्यात येत असलेल्या अतिशय निष्कृष्ट दर्जाच्या कामाचा प्रकार उघडकीस आणल्याने जामोद ग्रामपंचायत प्रशासनाच्या मनमानी कारभाराचा येथिल नागरीकांकडून तीव्र रोष व्यक्त करण्यात येत आहे संबधीत ठेकेदाराकडून या आठवडी बाजाराच्या तार कंपाउंडचे काम हे किती चांगल्या दर्जात केले असेल हे न बोललेलेच बरे शासनाचा कोट्यावधी रुपयांच्या येणाऱ्या निधींचा जास्तीत जास्त मलिदा कसा लाटता येईल असा प्रकार जामोद ग्रामपंचायत प्रशासनाकडून होत असल्याचे जामोद येथील जनतेतून बोलल्या जात आहे कारण मागे सुद्धा गावांत रस्ते नाल्यांसह धाप्यांची व इतरही करण्यात आलेली कामे ही अतिशय निष्कृष्ट दर्जात करण्यात आलेली आहे आता तरी ग्रामपंचायत प्रशासनाने निष्कृष्ट दर्जात होत असलेली कामे चांगल्या दर्जात करावी अशी मागणी येथिल सामाजिक कार्यकर्ते गौतम गवई यांच्या सह ग्रामस्थांकडून होत आहे.

## हिरे महाविद्यालयातील तक्रारींची प्रशासनाकडून दखल

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** येथील श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयात रुग्णांची आर्थिक लूट या मथळ्याखाली विविध वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या वृत्ताची रुग्णालय प्रशासनाने दखल घेतली आहे. प्रभारी अधिष्ठाता डॉ अरुण मोरे यांनी या तक्रारीची चौकशी करण्यासाठी पाच सदस्यीय समिती गठीत केली असून या दखल समितीने याबाबत सखोल चौकशी करुन चौकशी अहवाल तीन दिवसात सादर करण्याचे आदेश दिले आहेत. या समितीचे अध्यक्ष डॉ. अजित पाठक, प्राध्यापक व विभाग न्याय वैद्यकशास्त्र विभाग हे असून डॉ. मुकर्रम खान, वैद्यकीय अधीक्षक सर्वोपचार रुग्णालय, डॉ. राजेश सुभेदार, उपअधिष्ठाता प्रशासकीय भा.हि.शा.वै.म. डॉ. जीवन पवार, विभाग प्रमुख, मनोविकारशास्त्र विभाग, चंद्रकांत कुमावत, प्रशासकीय अधिकारी, सर्वोपचार रुग्णालय धुळे, हे सदस्य असणार आहेत. या समितीने या प्रकरणांची सखोल चौकशी करून स्वयंस्पष्ट अहवाल तीन दिवसांच्या आत सादर करावा, असे डॉ. अरुण मोरे, प्र. अधिष्ठता, सर्वोपचार रुग्णालय, धुळे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

## सचिन कुसनाळे यांच्या ग्रंथास राष्ट्रीय संत नामदेव वैचारिक साहित्य पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** समृद्धी प्रकाशन, हिंगोली यांच्यावतीने



'विश्ववाद' या श्री सचिन कुसनाळे लिखित वैचारिक ग्रंथास राष्ट्रीय संत नामदेव वैचारिक साहित्य पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे संयोजक प्रा.डॉ. श्रीराम कऱ्हाळे, मराठी विभाग प्रमुख शिवाजी महाविद्यालय-हिंगोली यांच्याहस्ते नुकतेच या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.प्रा.डॉ.कमलाकर चव्हाण, प्रा. टी.जे. कदम यांच्या परिक्षण समितीने या निवडी जाहीर केल्या.पुरस्कार वितरण सोहळ्यास अनेक मान्यवर साहित्यिक उपस्थित होते.जगभरातील थोर मानवतावादी विचारवंतांनी ज्या वैश्विकतेचे प्रतिपादन केले, ते आधुनिक पार्श्वभूमीवर कसे दृष्टीक्षेपात आले आहे, याची सैद्धांतिक मांडणी या ग्रंथातून करण्यात आली आहे. 'विश्ववाद' या ग्रंथास याआधीही वैचारिक पुरस्कार मिळाले आहेत. वैचारिक सर्जनशील साहित्यामध्ये या ग्रंथामुळे मोलाची भर पडली आहे. सचिन कुसनाळे यांनी अनेक वैचारिक ग्रंथांचे लेखन केले आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी 'स्वातंत्र्यायण' या स्वातंत्र्याच्या व्यवस्थापन विषयक ग्रंथाचेही त्यांनी लेखन केले आहे.

# शिंदे-फडणवीस सरकार शेतकऱ्यांच्या हिताचे काम करते

## एकाच वेळी एफआरपी आणि सरसकट वीज तोडणी नको, क्रांतिकारक निर्णय :भाजप प्रवक्ते राम कुलकर्णी

आधुनिक केसरी न्यूज





**अंबाजोगाई :** शिंदे-फडणवीस सरकार राज्यात आल्यापासुन शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक महत्वाचे निर्णय सरकारने घेतले असुन ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एकाच वेळी एफआरपी देण्याचा घेतलेला निर्णय, त्याचबरोबर शेतकऱ्यांची सरसकट वीज कनेक्शन तोडु नका, एकाने वीज भरले तरी पुरवठा चालु राहु द्या असे निर्णय क्रांतीकारक असुन खऱ्या अर्थाने राज्यात हे सरकार शेतकऱ्यांचं हित जोपासत असल्याची प्रतिक्रिया भाजपाचे राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी दिली.दरम्यान अडीच वर्षात ठाकरे सरकारनं शेतकऱ्यांची पिळवणुक केली. एव्हाना वीज वसुलीसाठी महिना महिना कनेक्शन तोडल्याची आठवण विरोधकांना त्यांनी करून दिली.

प्रसिद्धीसाठी दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, येथे पाहिजे जातीचे, येरागबाळ्याचे काम नोहे, शेतकऱ्यांच्या हिताच्या गप्पा मारायच्या, पोकळ आश्र्वासने द्यायची आणि त्यांना कुठल्याही संकटात मदत करायची नाही. पीक विमासुद्धा मिळवुन द्यायचा नाही. हा अनुभव ठाकरे सरकारच्या काळात शेतकऱ्यांनी घेतला. मागच्या वर्षी वीज वसुली धडक मोहिम राबवताना 2021 च्या परतीच्या पावसाने शेतकरी प्रचंड अडचणीत आला. त्यांना कुठल्याही प्रकारचे अनुदान नाही पण वीज देखील मिळु दिली नाही. एक एक महिना वीजेचे कनेक्शन जोडले नाही. अडीच वर्षात कवडीचा वीमा शेतकऱ्यांना मिळाला नाही. 2019 ला अतिवृष्टी पाहणीसाठी उद्धव ठाकरे मराठवाड्यात येवुन गेले. 50,000 रूपये हेक्टरी मागणी केली. काही दिवसानंतर मुख्यमंत्री झाले. पण आपण केलेल्या मागणीचा विसर त्यांनाच पडला होता. ज्यांनी 50,000 रूपये नुकसानभरपाईची मागणी केली. त्यांच्याच हातात देण्याचं काम आलं तेव्हा हेक्टरी 4000 रूपायाची मदत देखील केली नसल्याचा आरोप कुलकर्णी यांनी लावला. राज्यकर्ते शेतकऱ्यांच्या प्रश्नाची ओळख असणारे हवे. मग तिथे कुठे हिताची जोपासना होते. सत्तांतरानंतर राज्यात शिंदे-फडणवीसांचं सरकार आलं. त्याहुन अधिक देवेंद्र फडणवीस हे नेतृत्व शेतकऱ्यांची



ऱ्हदयात जावुन काळजी करण्यासारखं आहे. कारण जेवढ्या गोष्टी शेतकऱ्यांना देता येतील अगदी मुख्यमंत्री राज्यात 2014 ला झाल्यानंतर त्यांनी वेगवेगळ्या स्वरूपाचे अनुदान वाटप करताना शेतकऱ्यांना पगारी नोकरीसारखं मदत केली होती. आता पुन्हा ते सरकारमध्ये आल्यानंतर खरा न्याय शेतकऱ्यांना मिळतो आहे. ऊसाची एफआरपी एकाच वेळी द्यावी अशा प्रकारची मागणी वर्षानुवर्षे ऊस उत्पादक करत होते. पण साखर उद्योगामध्ये राष्ट्रवादीच्या पुढाऱ्यांची जास्त गर्दी असल्याने हा निर्णय् कधीच कुणी घेतला नाही. पण काल एफआरपी एकाच वेळेस देण्याचा जो निर्णय तो शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवणारा निश्चित म्हणावा लागेल. ज्याचं स्वागत शेतकरी नेते खा.राजु शेट्टी यांनी देखील केलं. त्याचबरोबर वीज कनेक्शन तोडू नका. एका ट्रान्सफरवर एखाद्या शेतकऱ्याने बील जरी भरले तरी विद्युत पुरवठा चालु राहु द्या किंवा ज्यांनी बील भरले नाही त्यांचाच बंद करा. अशा सुचना महावितरणला ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिल्या. हा देखील निर्णय अत्यंत लाभधारक म्हणावा लागेल. रब्बीचा हंगाम असुन वीज मुबलक मिळणे अत्यंत काळाची गरज आहे. ठाकरे सरकारने वसुलीपोटी वेठीस धरले होते. शिंदे-फडणवीस सरकारने मात्र या प्रश्नावर चांगला तोडगा काढून शेतकऱ्यांना न्याय देण्याचा केलेला प्रयत्न हिताचा असल्याची प्रतिक्रिया कुलकर्णी यांनी आपल्या पत्रकात बोलुन दाखविली.

# श्री विठ्ठल रुक्मिणी, श्री संत सेना महाराज मंदिर प्राणप्रतिष्ठेनिमित्त विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** दि २ ते ५ डिसेंबर रुद्रस्वाहाकार यज्ञ व किर्तन महोत्सवाचे आयोजन नाशिक जिल्ह्यातील लासलगाव येथील श्री विठ्ठल रुक्मिणी, श्री संत सेना महाराज, श्रीमद् भगवद्गीता मंदिर मूर्ती प्राणप्रतिष्ठा कलश रोहन व वास्तुपूजन सोहळ्यानिमित्त महामंडलेश्वर श्रीश्री १००८ श्री शिवगिरीजी महाराज, हभप ज्ञानेश्वर माऊली शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत रुद्रस्वाहाकार यज्ञ व किर्तन महोत्सवाचे आयोजन शुक्रवार (दि.२) ते सोमवार (दि ५) डिसेंबर २०२२ या कालावधीत करण्यात आल्याची माहिती श्री संत सेना चॅरीटेबल ट्रस्ट यांनी दिली. शहरातील विद्यानगर येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले असून चार दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार (दि.२) रोजी सकाळी १०/३० वाजता येथील दत्त मंदिरापासून भव्य शोभायात्रा काढली जाणार आहे.तरी सर्व समाज बांधव भगीनी अबालवृध्द यांनी सहभागी व्हावे.सायंकाळी ५ ते ६ या वेळेत हरिपाठ व महाआरती व प्रसाद वाटप रात्री ८ ते १० या वेळेत हभप भागवताचार्य बंडा महाराज खडांगळे लखमापूरकर यांचे कीर्तन होणार आहे. शनिवार (दि.३) रोजी सकाळी ८ वाजता स्थापित पिठस्थ देवता पूजन, रुद्रस्वाहाकार यज्ञ, होमहवन, मूर्तीस शय्याधिवास, मूर्ती धान्यधिवास कार्यक्रम होणार आहे. दुपारी ४ ते ६ या वेळेत गीता जयंती श्रीमद् भागवत गीता पठण, सायंकाळी ६ वाजता महाआरती, प्रसाद, रात्री ८ ते १० या वेळेत प्रा. सुधाकर वाघ डोंगरगाव यांचे कीर्तन होणार आहे. रविवार (दि ४ )रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत रुद्र स्वाहाकार यज्ञ ,उत्तरांग हवन क्षेत्रपाल पूजन, पूर्णोहूती, मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलाशारोहण समारोह महामंडलेश्वर श्री श्री १००८ श्री शिवगिरीजी महाराज व हभप ज्ञानेश्वर माऊली शिंदे तसेच त्रंबकेश्वर, नाशिक व पंचक्रोशीतील सर्व साधू संतांच्या उपस्थितीत संपन्न होणार.आहे रात्री ८ ते १० या वेळेत रामायणाचार्य हभप परशुराम महाराज अनर्थे यांचा कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. सोमवार( दि ५ ) रोजी सकाळी ९ ते ११ ह भ प ज्ञानेश्वर माऊली शिंदे यांचे काल्याचे किर्तन होणार असून दुपारी १२ ते २ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे कीर्तन महोत्सवाचा कार्यक्रम श्री सरस्वती विद्यालयाच्या प्रांगणात होणार असून इतर सर्व कार्यक्रम श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात होणार आहेत.या सर्व कार्यक्रमास मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहावे असे जाहिर आवाहन मंदिर समितीकडून करण्यात आले आहे.







# देव्हारी, पिंपळवाडी रस्त्याचे बोगस काम

## वाहनधारक, परिसरातील ग्रामस्थ यांच्यामधे तीव्र संताप

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील गिरडा घाट मार्गे बुलढाणा, अजिंठा, औरंगाबाद महामार्गाला जोडला जाणारा मुख्य रोड हा पूर्णपणे चाळणी चाळणी झाला आहे. यामुळे छोटेमोठे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या निकृष्ट कामामुळे वाहनधारक आणि परिसरातील ग्रामस्थ यांच्यामधे तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. पाच -सहा महिन्यापूर्वीच ठेकेदाने सोयगाव तालुक्यातील अजिंठा डोंगरदऱ्यांमधून जानारा सावळदबारा, देव्हारी, पिंपळवाडी मार्गे गिरडा घाटला जानाऱ्या रोडचे पूर्णपणे बोगस नित्कृष्ट दर्जाचे काम करुन मात्र बिल काढण्याचा सर्रासपणे धडा सुरु केलेला आहे. हा रोड पुर्णपणे चाळणी चाळनी झालेला असून त्यामधे ठेकेदाने या रोडच खडी डांबरीकरण काम रोड न खोदताच थातुर मातूर कमी प्रमानात डांबर टाकुन सर्रास पुर्णपणे बोगस नित्कृष्ट दर्जाचे काम केलेले आहे. मात्र शासन प्रशासन ..आणि इंजीनियर हे फक्त बघ्याची भूमीका का घेत आहे पाच सहा महिन्यापूर्वीच या रोड च काम पुर्णपणे ठेकेदाराने बोगस नित्कृष्ट दर्जाच काम करुन बिल काढण्याचा ग्रामीण डोंगराळ भागामधे जनु धडाच धरलेला आहे त्यामुळे पुर्ण रोड उखडुन मोठमोठे खड्डे पडुन पुर्ण खडी गिट्टी बाहेर पडलेली आहे. हा रोड गिरडा घाट मार्गे बुलढाणा, अजिंठा, औरंगाबाद महामार्गाला जोडला जाणारा मुख्य रस्ता रोड आहे या परिसरातील कमीत कमी 40 ते पन्नास गावचे गावकरी या रोडने प्रवास करतात विद्यार्थी, कर्मचारी, अधीकारी, शेतकरी, व्यापारी याच रोडने बुलढाणा, अजिंठा, सिल्लोड, औरंगाबाद, जालना या ठिकाणी हास्पील च्या कामासाठी, कॉलेजला, नौकरीसाठी काही शेतीमाल, भाजीपाला शेती औजारे घेण्यासाठी दररोज येने जाणे करतात बुलढाणा, अजिंठा, सिल्लोड, औरंगाबाद, जालना येथे जाण्यासाठी मुख्य रोड रस्ता हाच आहे. या रोडची ठेकेदाने पूर्णपणे चाळणी चाळनी करुन ठेवली आहे इंजीनियरचे सुद्धा या कामाकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे ठेकेदार मनमाणी करुन पूर्ण बोगस काम करीत आहे त्यामुळे अपघाताला हा रोड चालना देत असुन रोड वरती मोठमोठे खड्डे पडून खडी गिट्टी रोडवरती पडलेली असल्यामुळे अनेक गाड्यांचे अपघात होत आहे. या बेजबाबदार ठेकेदारावरती आणि इंजीनियर यांच्या वरती कोन आणि कधी कारवाई करणार अशी चर्चा सध्या या परिसरामधे नागरीकांमधे होत असून मोठा संताप व्यक्त केला जात आहे.

# हायवाचा फोटो का काढला म्हणून पत्रकारास वाळू माफीयांची मारहाण

आधुनिक केसरी न्यूज



**गंगापूर :** बुधवार दिनांक ३० रोजी दुपारी साडेतीन वाजेदरम्यान तहसीलदार सतीश सोनी यांच्या दालनासमोर सदरचा प्रकार घडला. शेंदूरवादा येथील पत्रकार विठ्ठल म्हस्के हे तहसील कार्यालयात येत असताना त्यांना शेंदूरवादा इसारवाडी मार्गावरील सुलतानपूर शिवारामध्ये महसूल विभागातर्फे वाळूने भरलेल्या हायवा वर कारवाई होत असल्याचे आढळून आले.म्हस्के यांनी मंडळ आधिकरि व तलाठी यांचा कारवाईचा फोटो काढला व गंगापूर कडे मार्गस्थ झाले. तो पर्यंत महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सदरचा हायवा तहसील कार्यालयात जमा केला होता. या ठिकाणी हायवाशी संबंधित असणारे देखील या ठिकाणी उपस्थित होते त्यांनी म्हस्के यांना पाहताच तहसीलदार यांच्या दालनासमोरच धक्काबुक्की करून मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. या वेळी म्हस्के आपला जीव वाचविण्यासाठी तहसीलदार यांच्या दालनात पळाले.या प्रसंगी कार्यालयात बघ्यांची तोबा गर्दी झाली होती सदर प्रकार तहसील कार्यालयाच्या सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला आहे. या प्रकरणी तहसीलदार सतीश सोनी यांनी देखील घडलेला सर्व प्रकार लेखी पत्राद्वारे पोलीस ठाणे गंगापूर यांना कळविला आहे. सायंकाळी पत्रकार विठ्ठल म्हस्के यांच्या फिर्यादीवरून गंगापूर पोलीस ठाण्यामध्ये संबंधित हायवा मालक संतोष आरगडे व इतर दोघे यांच्या विरोधात पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असुन याप्रकरणी पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया यांच्या मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी प्रकाश बेले पुढील तपास करत आहे.

# मेहेरगावात आढळला तरुणाचा मृतदेह

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मेहेरगाव येथे शाळेच्या परिसरात एका तरुणाचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली. अमोल विश्वास भामरे, असे मयत तरुणाचे नाव असून त्याचा घातपात करण्यात आल्याचा संशय नातेवाईकांनी व्यक्त केला आहे. पोलीस अधिक्षक संजय बारकुंड, अप्पर पोलीस अधिक्षक किशोर काळे, तालुका पोलिस ठाण्याचे पो.नि. दत्तात्रय शिंदे यांच्यासह पोलीस पथक घटनास्थळी रवाना झाले . पोलिसांनी मृतदेहाची प्राथमिक तपासणी करून मृतदेह ताब्यात शवविच्छेदनासाठी हिरे वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयीत रवाना केला . दरम्यान मयत अमोल भामरे हे एकुलते एक होते. त्यांच्या पश्चात आई , वडील , पत्नी आणि लहान मुलगा - मुलगी असा परिवार आहे . अमोल रात्री मित्रांसोबत पार्टीसाठी गेला होता . घरी परतला नव्हता . याबाबत पोलिस अधिक्षक तपास करीत असल्याची माहिती पोलीस अधिक्षक संजय बारकुंड यांनी दिली आहे .

# प्रभावी संप्रेषणासाठी भावना जपाव्यात : भामेरे

आधुनिक केसरी न्यूज


**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथील पहूरला केंद्रस्तरीय शिक्षण परिषद मनुष्य हा भावनाप्रधान प्राणी असून प्रभावी संप्रेषणासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या भाव -भावना समजून घेतल्या पाहिजेत, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयातील प्रयोगशील शिक्षक शंकर भामेरे यांनी केले. पहूर ग्रुप एज्युकेशन सोसायटी संचलित आर. टी. लेले हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेत जीवन कौशल्य या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. प्रारंभी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. जळगाव जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या निर्देशांन्वये शेरी आणि लोंढरी जिल्हा परिषद शाळांच्या वतीने सदर परिषदेचे आयोजन करण्यात आले. परिषदेचे अध्यक्षस्थान आर. टी. लेले हायस्कूलचे मुख्याध्यापक आर.बी. पाटील यांनी भूषविले. प्रास्ताविक ज्ञानेश्वर चौधरी यांनी केले. केंद्रप्रमुख भानुदास तायडे यांनी NAS 2021विश्लेषणात्मक चर्चा करून जळगाव जिल्ह्याची सद्यस्थिती याविषयी मार्गदर्शन करून प्रशासकीय परिपत्रकांचे वाचन केले. ज्ञानेश्वर चौधरी यांनी निपुण चाचणी क्रमांक दोन विषय निहाय चर्चा करून उपचारात्मक अध्यापनाविषयी मार्गदर्शन केले. अकबर शेख यांनी प्रिंट काढणे व पेज सेटअप याविषयी मार्गदर्शन केले. किशोर काळे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. यावेळी पहूर केंद्रातील शिक्षक मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# दीनमित्रकार मुकुंदराव पाटील पत्रकारिता व साहित्य पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** तालुक्यातील तरवडी येथील सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समितीचे वतीने देण्यात येणारे सन २०२१-२२ या वर्षीचे दीनमित्रकारमुकुंदराव पाटील राज्यस्तरीय पत्रकारीताव साहित्यपुरस्कारजाहीर करण्यात आल्याची माहिती स्मारक समितीचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग यांनी दिली.



नेवासा तालुक्यातील तरवडी येथीलदीनमित्रकारमुकुंदराव पाटील स्मारक समितीच्या वतीने सत्यशोधक विचारांशी बांधिलकी असणाऱ्या पत्रकारास व साहित्यासदीनमित्रकारमुकुंदराव पाटील स्मारक समिती तरवडी यांच्या वतीने १९९५ पासून दरवर्षीपुरस्कारदिले जातात. शनिवार दि.१ डिसेंबर २०२२ रोजीस्मारक समितीच्या सभागृहात सन २०२१-२२ च्या पुरस्कारांची घोषणा स्मारक समितीचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग व सचिव उत्तमराव पाटील यांनी घोषित केले ते असे...

दीनमित्रकारसत्यशोधक मुकुंदराव पाटील पत्रकारितापुरस्कार जेष्ठ पत्रकार अभिजित कांबळे ( संपादक,महाराष्ट्र टाईम्स ऑनलाईन, मुंबई)

**साहित्य पुरस्कार २०२१-२२**

दयाराम पाडलोस्कर, गोवा (बवाळ-कथा), प्रा. शिवाजीराव बागल, सोलापूर (ज्ञानमंदिरातील नंदादीप-कादंबरी), डॉ. नारायणा भोसले, मुंबई (देशोधडी -आत्मचरित्र), श्रीमती. सारिका उबाळे, अमरावती (कथार्सिस-काव्य), भारत सातपुते,लातूर (आम्ही फुले बोलतोय-बालकाव्य), प्रा. वसंत गिरी,बुलढाणा (तरुणांचे आयडॉल सुभाषचंद्र बोस-चरित्र), डॉ. प्रतिभा सुरेश जाधव,नाशिक (अस्वस्थतेची डायरी-वैचारिक लेखन), डॉ. तुकाराम रोंगटे,पुणे (आदिवासींचेही डॉ. बाबासाहेब आंबेडकर-समिक्षा), राकेश सांळुके,सातारा (दख्खण समृद्ध प्रवास-प्रवासवर्णन), योगेश प्रकाश बिडवाई,मुंबई (कांद्याची रडकथा शिवार ते बाजार-संशोधन), डॉ. शिवलिंग मेनकुदळे,पुणे (प्रबोधनाचा वसा आणि वारसा-व्यक्तिवेध).

वरीलपुरस्काररविवार दि.१८ डिसेंबर २०२२ रोजी तरवडी, ता. नेवासा येथे महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ.राजा दीक्षीत यांचे हस्ते प्रदान केले जाणार आहेत अशी माहीती दीनमित्रकारमुकुंदराव पाटील समितीचे अध्यक्ष माजी आ. पांडुरंग अभंग,उपाध्यक्ष कॉम.बाबा आरगडे, सचिव उत्तमराव पाटील यांनी दिली.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in